महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

• संपादक : राकेश शंकर गोरे

• वर्ष : १७ अंक : १७ पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार २८ जुलै २०२६ ते सोमवार ०३ ऑगस्ट २०२६ • POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 • PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### विमानतळ, रेल्वे स्थानक किंवा रुग्णालयाची राईड रद्द केल्यास पाचपट दंड!

**मुंबई :** खासगी ॲप-आधारित टॅक्सी सेवांमधील मनमानीला आळा घालण्यासाठी राज्य परिवहन विभागाने 'महाराष्ट्र मोटार वाहन ॲग्रिगेटर नियम, २०२६' अंतर्गत महत्त्वाचे बदल लागू केले आहेत. नव्या नियमांनुसार विमानतळ, रेल्वे स्थानक आणि रुग्णालयांसारख्या अत्यावश्यक ठिकाणांसाठी स्वीकारलेली राईड चालकाने रद्द केल्यास सामान्य दंडाच्या तुलनेत पाचपट दंड आकारला जाणार आहे. सामान्य राईड रद्द केल्यास भाड्याच्या १० टक्के किंवा कमाल १०० रुपये दंड आकारला जाईल. ही रक्कम थेट प्रवाशाच्या ॲप खात्यात जमा होईल. अपेक्षित वेळेनंतर १० मिनिटांहून अधिक विलंब झाल्यास राईड रद्द झाल्याचे मानले जाईल. ओला, उबरसह सर्व ॲग्रिगेटर कंपन्यांना २४x७ कॉल सेंटर, तक्रार निवारण व्यवस्था, लाईव्ह लोकेशन शेअरिंग, चालकाचे छायाचित्र तसेच मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये सेवा देणे बंधनकारक करण्यात आले आहे. चालकांची पोलीस पडताळणी, वैद्यकीय व मानसशास्त्रीय चाचणीही अनिवार्य असेल. वाहन बिघाड झाल्यास शहरांतर्गत ३० मिनिटांत आणि १०० किमीपेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी ६० मिनिटांत पर्यायी वाहन उपलब्ध करून देणे कंपन्यांना बंधनकारक राहील.

### गोपाळगड किल्ला अखेर शासनाच्या ताब्यात!

**रत्नागिरी :** गुहागर तालुक्यातील ऐतिहासिक व राज्य संरक्षित गोपाळगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत पुरातत्त्व विभागाने किल्ल्याची जमीन शासनाच्या ताब्यात आणण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया अधिकृतपणे सुरू केली आहे. किल्ला खासगी मालकीच्या जागेवर असल्यामुळे पर्यटकांना अनेक वर्षांपासून प्रवेशावेळी अडथळे, वाद आणि गैरवर्तनाचा सामना करावा लागत होता. या निर्णयाचे इतिहासप्रेमी, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांनी स्वागत केले आहे. अंजनवेल परिसरातील समुद्रकिनाऱ्यावर वसलेला हा किल्ला कोकणातील महत्त्वाचा ऐतिहासिक वारसा असून दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण परिसर शासनाच्या अखत्यारीत येणार आहे. त्यामुळे पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा, माहिती फलक, सुरक्षित प्रवेशमार्ग, तटबंदीची दुरुस्ती आणि संवर्धनाची कामे अधिक वेगाने करता येणार आहेत. तसेच राज्य संरक्षित स्मारक म्हणून पर्यटकांना मोफत व विनाअडथळा प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, पर्यटन विकासासह स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पेपरफुटीप्रकरणी केंद्र सरकारचा मोठा निर्णय

# दोषींना १० वर्षांची कैद आणि १० कोटींच्या दंडाची तरतूद

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) : देशभरातील विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेदरम्यान घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कठोर कायदेशीर तरतुदी लागू केल्या आहेत. नव्या कायद्यानुसार, प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षेत गैरव्यवहार किंवा संघटित फसवणुकीत दोषी आढळणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशा गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेल्या आरोपींना किमान ७ वर्षांपासून ते १० वर्षांपर्यंतचा तुरुंगवास होऊ शकतो. याशिवाय, ₹१० कोटींपर्यंतचा आर्थिक दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. गैरव्यवहारातून मिळवलेली मालमत्ता जप्त करण्याचाही अधिकार संबंधित यंत्रणांना देण्यात आला आहे. तसेच, पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द झाल्यास त्यासाठी झालेला संपूर्ण आर्थिक खर्च संबंधित दोषी संस्था किंवा व्यक्तीकडून वसूल करण्यात येणार आहे.**




या कठोर उपाययोजनांमुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढविणे, गैरव्यवहार रोखणे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कायम ठेवणे हा सरकारचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. नव्या कायद्यात केवळ पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या पेपरफुटीचाच नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), संगणक हॅकिंग, डिजिटल नेटवर्क किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका लीक करण्याच्या आधुनिक पद्धतींचाही स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा गैरवापर करून परीक्षा प्रक्रियेत हस्तक्षेप करणाऱ्यांवरही कठोर कारवाई होणार आहे. नव्या कायद्यानुसार अशा गुन्ह्यांचा जलद निपटारा करण्यासाठी प्रत्येक राज्यात फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. उपलब्ध माहितीनुसार, गुन्ह्याचा तपास दोन महिन्यांच्या आत पूर्ण करून तीन महिन्यांच्या आत निकाल देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, जेणेकरून दोषींना लवकर शिक्षा होईल आणि परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास अबाधित राहील. दरम्यान, महाराष्ट्र सरकारनेही पेपरफुटीच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यात घडलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर, पुढील वर्षापासून टीईटी परीक्षा पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऑनलाइन परीक्षा प्रणालीमुळे प्रश्नपत्रिकांची सुरक्षितता वाढेल, मानवी हस्तक्षेप कमी होईल आणि गैरव्यवहाराच्या शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी घेतलेल्या या उपाययोजनांमुळे भरती आणि स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता अधिक बळकट होण्यास मदत होईल, तसेच प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## डीपफेक बदनामीप्रकरणी नितीन गडकरी कोर्टात

### मेटा-गुगलविरोधात खटला चालवण्यास मंजुरी

**मुंबई (विशाल कारंडे) :** 'ई-२०' इंधन वादाशी संबंधित कथित 'डीपफेक' आणि कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) आधारित बदनामीकारक मजकुराप्रकरणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मेटा, गुगल आणि अन्य संबंधितांविरोधात दिवाणी बदनामीचा दावा दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी त्यांना यासाठी आवश्यक परवानगी दिली. गडकरी यांनी दाखल केलेल्या याचिकेत अज्ञात व्यक्तींनी समाजमाध्यमांवर कथित बदनामीकारक मजकूर प्रसारित केला असून, 'ई-२०' इंधन कार्यक्रमासाठी त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार असल्याचे चुकीच्या पद्धतीने दर्शविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात त्यांनी 'लेटर्स पेटंट'च्या कलम १२ अंतर्गत परवानगी




मागितली होती. न्यायमूर्ती अभय अहुजा यांच्या न्यायालयात सोमवारी या याचिकेवर सुनावणी झाली. दाव्याचे काही कारण मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्राबाहेर उद्भवत असल्याने, मूळ दिवाणी अधिकारक्षेत्रात दावा दाखल करण्यासाठी कलम १२ अंतर्गत परवानगी आवश्यक असल्याचे गडकरी यांच्या वतीने न्यायालयात स्पष्ट करण्यात आले. गडकरी यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रतिवादींनी कथित बदनामीकारक आणि 'डीपफेक' स्वरूपाचा मजकूर सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून दिला असून, तो मुंबईतील वापरकर्त्यांसह सर्वसामान्यांसाठी पाहण्यायोग्य होता.

▸ पान २ वर

## CJP आंदोलनादरम्यान ५०० हून अधिक संशयित सोशल मीडिया प्रोफाइल रडारवर

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** कॉकरोच जनता पार्टी (CJP)च्या देशव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सायबरने मोठी कारवाई करत सोशल मीडियावरील ५०० हून अधिक संशयास्पद प्रोफाइल आणि शेकडो आक्षेपार्ह पोस्ट रडारवर आणल्या आहेत. या खात्यांद्वारे अफवा, दिशाभूल करणारी माहिती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) मदतीने तयार करण्यात आलेला बनावट मजकूर व व्हिडिओ प्रसारित केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, संबंधित खात्यांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र सायबरने दिलेल्या माहितीनुसार, आंदोलनाचा गैरफायदा घेत




सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा आणि सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर व्यापक तपास सुरू करण्यात आला. या तपासात ओपन सोर्स इंटेलिजन्स (OSINT), डेटा विश्लेषण, वर्तन विश्लेषण आणि अत्याधुनिक एआय फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. तपासादरम्यान ५०० हून अधिक संशयास्पद सोशल मीडिया प्रोफाइलची ओळख पटविण्यात आली. यापैकी सुमारे १०० खाती भारताबाहेरून, विशेषतः पाकिस्तान आणि पश्चिम आशियातील काही देशांतून चालवली जात असल्याचा प्राथमिक निष्कर्ष समोर आला आहे. या खात्यांमधून आंदोलनाशी संबंधित दिशाभूल करणारे संदेश, बनावट दावे आणि समाजात तणाव निर्माण करणारा मजकूर प्रसारित होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र सायबरच्या तपासात इन्स्टाग्राम, एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक आणि युट्यूब या प्रमुख सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एकूण ४२९ आक्षेपार्ह पोस्ट आणि हँडल्सची नोंद करण्यात आली आहे. या पोस्टमधील अनेक मजकूर खोटा, दिशाभूल करणारा किंवा सामाजिक सलोखा बिघडविणारा असल्याचे प्राथमिक तपासात आढळले आहे. तपासातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर.

▸ पान २ वर

## लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीला सहा महिन्यांची मुदतवाढ

**मुंबई (सम्यक कासारे) :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी ही घोषणा करत पात्र लाभार्थी महिलांनी या कालावधीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले. ई-केवायसी अपूर्ण राहणे, कागदपत्रांतील त्रुटी किंवा तांत्रिक अडचणी यामुळे अनेक पात्र महिलांना योजनेचा मासिक हप्ता मिळू शकला नव्हता. नव्याने देण्यात आलेल्या मुदतवाढीमुळे अशा महिलांना आवश्यक दुरुस्त्या करून योजनेचा लाभ मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे हजारो लाभार्थी महिलांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा



व्यक्त केली जात आहे. सरकार मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबविण्यास कटिबद्ध असून, पात्र असलेल्या कोणत्याही महिलेवर अन्याय होऊ नये यासाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचे अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. लाभार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये आणि पात्र महिलांपर्यंत योजनेचा लाभ वेळेवर पोहोचावा, यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, लाडकी बहीण योजनेतील मासिक आर्थिक मदतीच्या रकमेतील वाढीबाबत सुरू असलेल्या चर्चेवरही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. हप्त्यात वाढ करायची की नाही, याबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री घेतील आणि योग्य वेळी सरकारची अधिकृत भूमिका जाहीर केली जाईल, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय दिल्लीतील आंदोलन तसेच विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांबाबतही माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना अदिती तटकरे यांनी उत्तर देत सरकारची भूमिका स्पष्ट केली. मात्र, लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा आणि कोणतीही महिला केवळ तांत्रिक कारणांमुळे योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी ई-केवायसी पूर्ण करण्यास देण्यात आलेली सहा महिन्यांची मुदतवाढ हा महत्त्वाचा निर्णय असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

## मोनो रेल-महालक्ष्मी जोडणारा ट्रॅव्हलेटर ९० टक्के पूर्ण




**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मोनो रेलच्या संत गाडगे महाराज स्थानकापासून उपनगरी रेल्वे व मेट्रो-३च्या महालक्ष्मी स्थानकापर्यंत प्रवाशांचा प्रवास सुलभ करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या ट्रॅव्हलेटरचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून बंद असलेली मोनो रेल सेवा पुन्हा सुरू झाल्यानंतर हा ट्रॅव्हलेटरही प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, त्यामुळे दोन्ही स्थानकांदरम्यान बदलण्यासाठी लागणारा वेळ सुमारे २० मिनिटांनी कमी होणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मोनो रेलला पश्चिम उपनगरी रेल्वे आणि मुंबई मेट्रो-३शी जोडण्यासाठी हा प्रकल्प राबवत आहे. चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक ही २० किलोमीटरची मोनो मार्गिका उपनगरी रेल्वेशी थेट जोडलेली नसल्याने तिला अपेक्षित प्रवासी प्रतिसाद मिळत नाही.

▸ पान २ वर

## नियम मोडणाऱ्या 'बेस्ट' चालकांना लगाम!

### साध्या वेशातील अधिकारी बसमधून ठेवणार गुप्तरित्या लक्ष

**मुंबई (गणेश बागडे) :** मुंबईकरांची दुसरी लाईफलाइन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेस्ट बस सेवेच्या सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी बेस्ट प्रशासनाने चालकांवर विशेष गुप्त तपासणी मोहीम सुरू केली आहे. गेल्या काही महिन्यांत घडलेल्या बस अपघातांच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम हाती घेण्यात आली असून, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणाऱ्या चालकांवर कोणतीही दया न दाखवता कठोर कारवाई करण्यात येणार आहे. विशेष तपासणीदरम्यान चालक बस चालवत असताना मोबाईलवर बोलताना, संदेश पाहताना किंवा



इअरफोनचा वापर करताना आढळल्यास त्याच्यावर तातडीने आर्थिक दंड आकारला जाईल. वारंवार नियमभंग करणाऱ्या चालकांवर अधिक कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित खासगी बस ऑपरेटरविरोधातही आवश्यक ती कायदेशीर व प्रशासकीय पावले उचलली जाऊ शकतात. प्रवाशांच्या जीवाशी संबंधित कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे अधिकारी साध्या वेशात सामान्य प्रवासी म्हणून बसमधून प्रवास करतील.

▸ पान २ वर

## गरीब रुग्णांचे उपचार पैशाअभावी थांबणार नाहीत : मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर (नितीन देवळेकर) :** "आजार कितीही गंभीर असला तरी केवळ पैशाअभावी कोणत्याही गरीब रुग्णाचे उपचार किंवा शस्त्रक्रिया थांबू नयेत, यासाठी राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांद्वारे आवश्यक निधी उपलब्ध करून दिला आहे," असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्रांगणात आयोजित महाआरोग्य शिबिरात रविवारी ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते फिरता दवाखाना आणि रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना व्हीलचेअरचे वितरण करण्यात आले. विविध सामाजिक संस्था आणि दात्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच गंगाधरराव फडणवीस स्मृती डायग्नोस्टिक सेंटरसाठी आर्थिक मदत आणि रुग्णवाहिका



प्रदान केल्या. या सर्व दात्यांचा तसेच महाआरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनात योगदान देणाऱ्या डॉक्टरांचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचाव्यात, हा या महाआरोग्य शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाने सर्वसामान्यांना उपचार सहज उपलब्ध व्हावेत यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून, सरकारी रुग्णालयांची संख्या वाढविण्याबरोबरच महात्मा फुले जनआरोग्य योजनेत यापूर्वी समाविष्ट नसलेल्या अनेक गंभीर आजारांचाही समावेश करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. गेल्या दीड वर्षांत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षामार्फत ५७ हजार रुग्णांना उपचारांसाठी तब्बल ४५२ कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, धर्मादाय रुग्णालयांमधील गरजू रुग्णांसाठी राखीव खाटांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी डिजिटल व्यवस्था विकसित करण्यात आली आहे. काही गंभीर आजारांचे उपचार महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या ५ लाख रुपयांच्या मर्यादेत शक्य नसल्याने अशा रुग्णांसाठी शासनाने विशेष धोरण आखले आहे.

▸ पान २ वर

संपादक : राकेश शंकर गोरे

संपादकीय

## युवाशक्तीचा विजय, शिक्षणव्यवस्थेसाठी नवा अध्याय

पेपरफुटीच्या घटनांनी देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील जंतर-मंतर येथे तब्बल ३७ दिवस चाललेल्या विद्यार्थी आंदोलनाने अखेर निर्णायक यश मिळवले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची घोषणा आणि परीक्षा व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याबाबत केंद्र सरकारने दिलेली लेखी हमी यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. हा केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा प्रसंग नसून, संघटित आणि संयमी युवा आंदोलनाने लोकशाही व्यवस्थेत घडवून आणलेल्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा आहे.देशातील तरुणाईने या आंदोलनातून एक स्पष्ट संदेश दिला आहे—विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही. पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील अनियमितता आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये असंतोष वाढत होता. नीट, नेट, विविध भरती परीक्षा आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहारांनी विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत केला होता. या पार्श्वभूमीवर उभे राहिलेले आंदोलन ही केवळ एका परीक्षेची प्रतिक्रिया नव्हती, तर शिक्षण व्यवस्थेतील साचलेल्या असंतोषाचा उद्रेक होता. लोकशाहीत आंदोलन हे नागरिकांचे घटनात्मक शस्त्र मानले जाते. मात्र, ते शांततापूर्ण, संयमी आणि मुद्देसूद असेल तरच त्याची ताकद अधिक प्रभावी ठरते. जंतर-मंतरवरील आंदोलनाने याच परंपरेचे दर्शन घडवले. उन्हाळा, पाऊस आणि अनेक अडचणींचा सामना करत विद्यार्थ्यांनी सातत्याने आपली भूमिका मांडली. सोशल मीडियापासून देशभरातील रस्त्यांपर्यंत या आंदोलनाला व्यापक पाठिंबा मिळाला. अखेर सरकारलाही विद्यार्थ्यांच्या भावनांची दखल घ्यावी लागली. या आंदोलनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे राजकीय पक्षांची भूमिका. अनेक विरोधी पक्षांनी आंदोलनाला पाठिंबा दिला असला, तरी विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांना राजकीय रंग लागू दिला नाही. त्यामुळे आंदोलनाचा केंद्रबिंदू कायम शिक्षणव्यवस्था आणि विद्यार्थ्यांचे भविष्य हाच राहिला. यामुळेच या आंदोलनाची विश्वासार्हता टिकून राहिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करण्यापेक्षा त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विधायक भूमिका घेण्याची गरज या आंदोलनाने अधोरेखित केली. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने राजकीय जबाबदारी निश्चित झाली असली, तरी प्रश्न इतक्यावर संपत नाही. राजीनामा हा केवळ प्रारंभ आहे; खरी परीक्षा आता सरकारसमोर आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्या लागतील. प्रश्नपत्रिकांची छपाई, वाहतूक, वितरण, डिजिटल सुरक्षा, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन आणि निकाल प्रक्रिया या प्रत्येक टप्प्यावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झाला आहे. केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा कायद्यात कठोर सुधारणा करण्याची तयारी दर्शवली आहे. दोषींना कठोर शिक्षा, मोठा दंड आणि फास्ट ट्रॅक न्यायालयांद्वारे खटल्यांचा जलद निकाल अशा उपाययोजनांची घोषणा करण्यात आली आहे. हे स्वागतार्ह असले, तरी केवळ कठोर शिक्षा हा उपाय नाही. पेपरफुटीची मूळ कारणे शोधून त्यांचे निर्मूलन करणे अधिक आवश्यक आहे. यासाठी तंत्रज्ञान, प्रशासन आणि जबाबदारीची साखळी अधिक मजबूत करावी लागेल. आजची परीक्षा व्यवस्था अजूनही गुण, पाठांतर आणि एका दिवसाच्या कामगिरीवर आधारित आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेपेक्षा गुणांना अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे एका परीक्षेतील छोट्या त्रुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येते. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने कौशल्याधारित शिक्षणाचा मार्ग दाखवला असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी अद्याप अपेक्षित आहे. शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षा पास करणे नसून विचारक्षम, संशोधक आणि सक्षम नागरिक घडवणे हा असायला हवा. नव्या नेतृत्वासमोर अनेक आव्हाने आहेत. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीची पुनर्रचना, डिजिटल सुरक्षा मजबूत करणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, स्वतंत्र देखरेख यंत्रणा आणि राज्यांशी प्रभावी समन्वय या बाबींकडे तातडीने लक्ष द्यावे लागेल. यासोबतच विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे हीदेखील मोठी जबाबदारी असेल. या आंदोलनाने आणखी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. देशातील तरुणाई केवळ सोशल मीडियावर प्रतिक्रिया देणारी पिढी नाही, तर प्रश्नांवर संघटितपणे, शांततेच्या मार्गाने आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवून लढणारी शक्ती आहे. योग्य नेतृत्व आणि स्पष्ट उद्दिष्ट असेल, तर युवाशक्ती शासनालाही निर्णय बदलण्यास भाग पाडू शकते, हे या आंदोलनाने सिद्ध केले. विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा जिंकण्यासाठी सरकारने दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरवणे अत्यंत आवश्यक आहे. परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलात आल्या, तरच या आंदोलनाचे खरे यश मानले जाईल. अन्यथा राजीनामा आणि आश्वासने हा केवळ तात्पुरता दिलासा ठरेल. युवकांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. आता सरकारनेही तेवढ्याच प्रामाणिकपणे शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीची जबाबदारी पार पाडली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न हा कोणत्याही सरकारच्या प्रतिष्ठेचा नव्हे, तर देशाच्या प्रगतीचा विषय आहे. त्यामुळे ही संधी व्यापक सुधारणांमध्ये रूपांतरित झाली, तरच या आंदोलनाची खरी ऐतिहासिक नोंद होईल.

# स्वयं-संघटन : निसर्गातील अदृश्य बुद्धिमत्तेचे अद्भुत विज्ञान



जीवसृष्टी आणि निसर्ग यांचा बारकाईने अभ्यास केला तर एक विलक्षण वैशिष्ट्य वारंवार लक्षात येते—कोणत्याही केंद्रीय नियंत्रणाशिवाय, कोणत्याही नेत्याशिवाय आणि ठरावीक आराखड्याशिवाय अनेक गुंतागुंतीच्या, सुंदर आणि शिस्तबद्ध रचना तयार होत असतात. विज्ञानाच्या भाषेत या प्रक्रियेला 'स्वयं-संघटन' (Self-Organization) असे म्हणतात. आधुनिक भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, संगणकशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या सर्व क्षेत्रांमध्ये स्वयं-संघटन ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना मानली जाते. निसर्गातील अनेक चमत्कार या एका तत्त्वावर आधारलेले आहेत. हिमकणांची नक्षी, वाळवंटातील वाळूच्या टेकड्या, समुद्रातील माशांचे थवे, आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांचे समूह, मुंग्यांच्या वसाहती, मधमाशांचे पोळे आणि अगदी मानवी शरीराची निर्मितीही स्वयं-संघटनाचे उत्कृष्ट नमुने आहेत. मानवी समाजात एखादी मोठी व्यवस्था निर्माण करण्यासाठी नियोजन, नेतृत्व आणि नियंत्रण आवश्यक असते. एखादे शहर उभारण्यासाठी नगररचनाकार लागतात. वाहतुकीसाठी नियम आणि सिग्नल लागतात. एखादा वाद्यवृंद सुरेल वाजण्यासाठी संचालकाची गरज असते. त्यामुळे जिथे शिस्त दिसते, तिथे कोणीतरी नियंत्रण ठेवत असेल, अशी आपली नैसर्गिक समजूत असते. परंतु निसर्ग अनेकदा याच्या अगदी विरुद्ध उदाहरणे दाखवतो. येथे लाखो स्वतंत्र घटक कोणत्याही आदेशाशिवाय एकमेकांशी संवाद साधत स्वतःच सुव्यवस्था निर्माण करतात. हिमकण हे स्वयं-संघटनाचे सर्वात मोहक उदाहरण आहे. ढगांमधील पाण्याची वाफ गोठू लागली की सूक्ष्म बर्फाचे स्फटिक तयार होतात. पाण्याच्या रेणूंच्या विशिष्ट रासायनिक रचनेमुळे ते सहा दिशांनी जोडले जातात आणि षटकोनी आकार निर्माण होतो. हिमकण पृथ्वीच्या दिशेने खाली येताना तापमान, आर्द्रता आणि हवेचा प्रवाह यांनुसार त्याच्या शाखा विकसित होत जातात. प्रत्येक हिमकणाचा मूलभूत षटकोनी आराखडा सारखाच असतो; मात्र त्यावरील सूक्ष्म नक्षीकाम वेगळे असते. आजपर्यंत पूर्णपणे एकसारखे दोन नैसर्गिक हिमकण सापडल्याची नोंद नाही. ही विविधता कोणत्याही कलाकाराची निर्मिती नसून, स्वयं-संघटनाचा परिणाम आहे. वाळवंटातील वाळूच्या टेकड्यांची रचना पाहिली तरी असेच आश्चर्य वाटते. हजारो किलोमीटरपर्यंत पसरलेल्या वाळवंटात टेकड्या एकाच दिशेने आणि जवळपास समान अंतरावर दिसतात. पाहणाऱ्याला जणू कोणीतरी त्यांची आखणी केली आहे असे वाटते. प्रत्यक्षात प्रत्येक वाळूचा कण स्वतंत्रपणे वाऱ्यामुळे हलत असतो. वाऱ्याचा वेग, दिशा, जमिनीचा उतार आणि कणांचे वजन यांतील परस्परसंवादातून लहान उंचवटे तयार होतात. एकदा उंचवटा तयार झाला की त्यामागे वाऱ्याचा वेग कमी होतो आणि अधिक वाळू तेथे साचते. कालांतराने तो उंचवटा भव्य टेकडीत रूपांतरित होतो. लाखो कणांच्या साध्या हालचालींमधून निसर्गाची ही भव्य शिल्पकला आकार घेते. जीवसृष्टीत स्वयं-संघटन अधिक प्रभावी स्वरूपात दिसते. संध्याकाळच्या वेळी युरोपमधील आकाशात स्टारलिंग पक्ष्यांचे हजारो पक्षी एकाच वेळी दिशाबदल करताना दिसतात. या अद्भुत दृश्याला 'मर्म्युरेशन' असे म्हणतात. प्रथमदर्शनी असे वाटते की एखादा नेता संपूर्ण थव्याचे नेतृत्व करत आहे. परंतु संशोधनातून स्पष्ट झाले आहे की या थव्याला कोणताही नेता नसतो. प्रत्येक पक्षी आपल्या आसपासच्या काही पक्ष्यांच्या हालचाली पाहतो आणि त्यानुसार स्वतःची दिशा बदलतो. या साध्या नियमामुळे संपूर्ण थवा क्षणार्धात दिशा बदलतो. स्थानिक पातळीवरील छोटे निर्णय जागतिक पातळीवरील सुव्यवस्था निर्माण करतात, हे यामधून दिसून येते. समुद्रातील माशांचे थवेही याच तत्त्वावर कार्य करतात. हजारो मासे एकत्र पोहत असताना अचानक एकाच क्षणी दिशा बदलतात, पण त्यांची धडक होत नाही. प्रत्येक मासा शेजारच्या माशांपासून ठरावीक अंतर राखतो, त्यांच्या वेगाशी जुळवून घेतो आणि त्याच दिशेने पोहतो. यामुळे संपूर्ण थवा एका सजीवासारखा वाटतो. या पद्धतीमुळे भक्षकांपासून संरक्षण मिळते आणि पोहण्यासाठी लागणारी ऊर्जा देखील कमी खर्च होते. मुंग्यांच्या वसाहती स्वयं-संघटनाचा आणखी एक उत्कृष्ट नमुना आहेत. लाखो मुंग्या एका राणीभोवती राहतात, परंतु कोणत्याही मुंगीला संपूर्ण वसाहतीचा आराखडा माहीत नसतो. अन्न शोधणे, घर बांधणे, अळ्यांची काळजी घेणे किंवा नवीन मार्ग तयार करणे या सर्व गोष्टी त्या फेरोमोन नावाच्या रासायनिक संकेतांच्या आधारे करतात. एखाद्या मुंगीला अन्न सापडले की ती मागे रासायनिक सुगंध सोडते. इतर मुंग्या त्या मार्गाचा पाठलाग करतात. अन्नस्रोत अधिक चांगला असेल, तर त्या मार्गावर अधिक फेरोमोन साचतो आणि तो मार्ग अधिक मजबूत बनतो. परिणामी कोणत्याही केंद्रीय नियोजनाशिवाय सर्वात कार्यक्षम मार्ग निवडला जातो. आज संगणकशास्त्रातील अनेक अल्गोरिदम या तत्त्वावर विकसित झाले आहेत.मधमाशांच्या पोळ्यातही अशीच अद्भुत व्यवस्था दिसते. हजारो मधमाशा एकत्र येऊन अत्यंत अचूक षटकोनी मेणपोळे तयार करतात. षटकोनी रचना ही कमीत कमी मेण वापरून जास्तीत जास्त मध साठवण्याचा सर्वात कार्यक्षम आकार असल्याचे गणितज्ञांनी सिद्ध केले आहे. मात्र मधमाशांनी हे गणित शिकलेले नसते. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत स्वयं-संघटनामुळे हा सर्वाधिक परिणामकारक नमुना विकसित झाला आहे.स्वयं-संघटनाचे सर्वात गुंतागुंतीचे उदाहरण म्हणजे मानवी शरीर. एका सूक्ष्म फलित अंडपेशीपासून अब्जावधी पेशी निर्माण होतात. या पेशी योग्य वेळी विभाजित होतात, एकमेकांशी रासायनिक संदेशांची देवाणघेवाण करतात, योग्य ठिकाणी स्थलांतर करतात आणि शेवटी हृदय, मेंदू, फुफ्फुसे, यकृत, त्वचा यांसारख्या विविध अवयवांमध्ये रूपांतरित होतात. या संपूर्ण प्रक्रियेसाठी कोणताही बाह्य नियंत्रक नसतो. पेशींच्या परस्परसंवादातूनच संपूर्ण शरीराची निर्मिती घडते.आज स्वयं-संघटनाची संकल्पना आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, इंटरनेट नेटवर्क, स्वयंचलित वाहतूक व्यवस्था, ड्रोनचे समूह आणि अवकाश संशोधन या क्षेत्रांत याचा प्रभाव वाढत आहे. अनेक लहान ड्रोन एकत्र येऊन मोठे काम पूर्ण करण्याच्या प्रणाली विकसित केल्या जात आहेत. प्रत्येक ड्रोनला संपूर्ण मोहिमेची माहिती नसते. तो केवळ शेजारच्या ड्रोनशी समन्वय साधतो. हे तत्त्व थेट पक्ष्यांच्या थव्यांपासून प्रेरित आहे. भविष्यात आपत्ती व्यवस्थापन, शेती, संरक्षण, औद्योगिक उत्पादन आणि आरोग्य सेवांमध्येही या तंत्रज्ञानाचा व्यापक वापर अपेक्षित आहे.स्वयं-संघटनाची संकल्पना समाजव्यवस्थेलाही महत्त्वाचा संदेश देते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर अधिक नियंत्रण, अधिक नियम किंवा अधिक हस्तक्षेप यातच असते असे नाही. अनेक वेळा योग्य संवाद, परस्पर विश्वास, सहकार्य आणि परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता यांमधूनही उत्कृष्ट व्यवस्था निर्माण होऊ शकते. निसर्गाने कोट्यवधी वर्षांत या तत्त्वाची यशस्वी परीक्षा घेतली आहे. हिमकणांची नाजूक नक्षी, वाळूच्या टेकड्यांची नियमित रचना, पक्ष्यांचे एकसंध उड्डाण, माशांचे समन्वित पोहणे, मुंग्यांची कार्यक्षम व्यवस्था, मधमाशांचे वैज्ञानिक पोळे आणि मानवी शरीराची निर्मिती या सर्व उदाहरणांतून एकच गोष्ट स्पष्ट होते—अव्यवस्था ही नेहमी गोंधळाचे प्रतीक नसते; योग्य परिस्थिती, योग्य परस्परसंवाद आणि साध्या नियमांचे सातत्यपूर्ण पालन यांमधून तीच अव्यवस्था अद्भुत सुव्यवस्थेत रूपांतरित होऊ शकते. स्वयं-संघटन ही निसर्गाच्या बुद्धिमत्तेची साक्ष आहे. ती आपल्याला शिकवते की महान व्यवस्था अनेकदा छोट्या, साध्या आणि स्वतंत्र कृतींच्या एकत्रित परिणामातून जन्माला येते. हाच निसर्गाचा सर्वात मोठा चमत्कार आहे.

## पान १ वरून...

### गरीब रुग्णांचे उपचार पैशाअभावी थांबणार नाहीत : मुख्यमंत्री...

त्यानुसार काही आजारांसाठी ९ लाख रुपयांपर्यंत, तर अत्यंत गंभीर आजारांच्या उपचारांसाठी ३५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच ऐकू न आल्यामुळे बोलता न येणाऱ्या लहान मुलांसाठी कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत सुरू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. या उपक्रमामुळे अनेक मुलांना ऐकण्याबरोबरच बोलण्याची क्षमता प्राप्त होणार असून, भविष्यात मूकबधिर मुलांची संख्या कमी करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. दिव्यांग बांधवांसाठी ९ ऑगस्ट रोजी कृत्रिम पाय आणि कृत्रिम हातांचे वितरण करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दर्जेदार आरोग्य सेवा, आधुनिक उपचार आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून निरोगी समाज घडविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, भाजपचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार अजित गोपचडे, आमदार प्रवीण दटके, संजय भेंडे, मोहन मते, राजीव पोतदार, महापौर नीता ठाकरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### नियम मोडणाऱ्या 'बेस्ट' चालकांना लगाम!

चालकाला कोणतीही पूर्वकल्पना न देता त्याच्या वाहन चालविण्याच्या पद्धतीवर, मोबाईल वापरावर, वाहतूक नियमांच्या पालनावर आणि सुरक्षित वाहनचालक म्हणून असलेल्या जबाबदारीवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. चालक सुरक्षितपणे बस चालवत आहे का, प्रवाशांशी योग्य वर्तन करतो का आणि वाहतुकीचे नियम पाळतो का, याचीही नोंद तपासणी पथकांकडून केली जाणार आहे. बेस्ट प्रशासनाने ही मोहीम अचानक सुरू केलेली नसून, अलीकडील गंभीर बस अपघातांनंतर प्रवाशांच्या सुरक्षेबाबत निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे शहरातील सर्व डेपोमध्ये वेळोवेळी अचानक तपासण्या करण्यात येणार असून चालकांच्या कामकाजावर सातत्याने देखरेख ठेवली जाईल. तपासणीदरम्यान कोणतीही गंभीर त्रुटी आढळल्यास त्याचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवून त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल. नियमभंगाची पहिली घटना आढळल्यास दंड आकारला जाईल, तर पुनरावृत्ती झाल्यास दंडाची रक्कम वाढविण्याबरोबरच अधिक कठोर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. चालकांसह बस चालविणाऱ्या कंपन्यांनाही प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पार पाडावी लागणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने काही वर्षांपासून रखडलेली इलेक्ट्रिक डबल डेकर बस योजना पुन्हा गतीने पुढे नेण्याची तयारीही सुरू आहे. या आधुनिक बसेस सेवेत दाखल झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सुरक्षित, विश्वासार्ह आणि शिस्तबद्ध बस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असल्याचे बेस्ट प्रशासनाने पुन्हा अधोरेखित केले असून, भविष्यात निष्काळजी चालकांविरोधात आणखी कठोर भूमिका घेतली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### डीपफेक बदनामीप्रकरणी नितीन गडकरी कोर्टात

त्यामुळे दाव्याचे कारण मोठ्या प्रमाणात मुंबईच्या प्रादेशिक हद्दीत निर्माण होत असल्याने मुंबई उच्च न्यायालयाला हा दावा ऐकण्याचा आणि त्यावर निर्णय देण्याचा अधिकार प्राप्त होतो. याचबरोबर संबंधित मजकूर इंटरनेटद्वारे मुंबईबाहेरही उपलब्ध असल्याने दाव्याचे काही कारण न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेरही उद्भवते. त्यामुळे 'लेटर्स पेटंट'च्या कलम १२ नुसार पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. गडकरी यांच्या वतीने करण्यात आलेला संक्षिप्त युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायमूर्ती अभय अहुजा यांनी त्यांना दिवाणी दावा दाखल करण्यास परवानगी दिली. या आदेशामुळे गडकरी आता मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ दिवाणी अधिकारक्षेत्रात मेटा, गुगल तसेच इतर संबंधित संस्था आणि अज्ञात व्यक्तींविरोधात बदनामीचा दावा दाखल करू शकतील. प्रस्तावित दाव्यात विविध समाजमाध्यम व्यासपीठे आणि अन्य संबंधित पक्षांचा समावेश असणार असून, कथित वादग्रस्त 'डीपफेक' आणि एआय-आधारित मजकूर प्रसारित करणे किंवा त्याच्या प्रसारास मदत केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात येणार आहे

### मोनो रेल-महालक्ष्मी जोडणारा ट्रॅव्हलेटर ९० टक्के पूर्ण

संत गाडगे महाराज स्थानकापासून महालक्ष्मी स्थानक सुमारे ७०० मीटर अंतरावर असल्याने प्रवाशांना पायी चालावे लागत होते. त्यामुळे अनेक जण मोनो रेलचा पर्याय टाळत होते. सुरुवातीला सुमारे ४५० मीटर लांबीचा ट्रॅव्हलेटर उभारण्याचे नियोजन होते. मात्र, जेकब सर्कलच्या पुढे जागेची अडचण निर्माण झाल्याने त्याचा शेवट तेथेच करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे २८३ मीटर लांबीचा एकात्मिक पादचारी पूल उभारण्यात येत असून त्यावर एकूण १७६ मीटर लांबीचे सहा ट्रॅव्हलेटर्स बसविण्यात येणार आहेत. या प्रकल्पात प्रवाशांच्या सोयीसाठी ११ मीटर रुंद पादचारी पूल, सर्वसमावेशक प्रवेशासाठी दोन लिफ्ट्स तसेच प्रति तास सुमारे ४,५०० प्रवाशांची क्षमता असलेली व्यवस्था करण्यात आली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मोनो रेल, उपनगरी रेल्वे आणि मेट्रो-३ यांच्यातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर होणार असल्याचे एमएमआरडीएने स्पष्ट केले आहे.

### CJP आंदोलनादरम्यान ५०० हून अधिक संशयित सोशल मीडिया...

महाराष्ट्र सायबरच्या म्हणण्यानुसार, १४० हून अधिक पोस्ट आणि प्रोफाइलमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट गर्दी दाखविणारी छायाचित्रे, कृत्रिम आवाज आणि लोकप्रतिनिधींचे मॉर्फ केलेले किंवा डीपफेक व्हिडिओ प्रसारित करण्यात आले होते. या माध्यमातून आंदोलनाचे स्वरूप अतिरंजित दाखविण्याचा तसेच जनमतावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. या सर्व डिजिटल पुराव्यांची महाराष्ट्र सायबरच्या ऑडिओ-व्हिडिओ फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून वैज्ञानिक पद्धतीने पडताळणी करण्यात आली आहे. त्यानंतर संबंधित सोशल मीडिया कंपन्यांशी संपर्क साधून आक्षेपार्ह पोस्ट हटविणे, संशयित खाती बंद करणे आणि आवश्यक ती कायदेशीर कारवाई सुरू करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या या नोडल सायबर एजन्सीने नागरिकांनाही विशेष आवाहन केले आहे. कोणत्याही संवेदनशील विषयावर सोशल मीडियावर दिसणारी माहिती तात्काळ पुढे पाठवू नये, तिची अधिकृत स्रोतांकडून पडताळणी करावी आणि खात्री झाल्यानंतरच ती इतरांसोबत शेअर करावी, असे महाराष्ट्र सायबरने स्पष्ट केले आहे. दिशाभूल करणारे व्हिडिओ, छायाचित्रे किंवा संदेश व्हायरल करण्यापूर्वी त्यामागील सत्य जाणून घेणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. सायबर तज्ज्ञांच्या मते, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वाढता वापर ही देशासमोरील नवी सुरक्षा समस्या बनत आहे. काही सेकंदांत तयार होणारे बनावट व्हिडिओ किंवा ऑडिओ सामान्य नागरिकांना सहज फसवू शकतात. त्यामुळे केवळ तांत्रिक कारवाई पुरेशी नसून डिजिटल साक्षरतेलाही तेवढेच महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र सायबरने स्पष्ट केले आहे की, सामाजिक शांतता, कायदा व सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेला बाधा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा संघटित डिजिटल नेटवर्कविरोधात भविष्यातही कठोर कारवाई सुरूच राहणार आहे. सोशल मीडियाचा गैरवापर करून अफवा पसरविणे किंवा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध विद्यमान कायद्यांनुसार कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही देण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, यांचे कार्यालय
☎ २२०१६९७४/७६
Email : intergratedmumbai.ee@mahapwd.com
ई-निविदा सुचना क्र.४१

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून अनुभवी कंत्राटदार व पुरवठादार यांच्याकडून खालील कामाकरीता "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) पध्दतीने मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव :-
1) बांधकाम भवन इमारतीमधील जिने, प्रसाधन गृहे, पॅसेज, व्हरांडा इ.भागाची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे. (कालावधी १ वर्ष) (अंदाजित रक्कम रुपये ४२.९९ लक्ष)
2) जगन्नाथ भोसले मार्ग येथील सारंग या निवासी इमारतीची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे. (कालावधी १ वर्ष) (अंदाजित रक्कम रुपये २९.९८ लक्ष)
3) जगन्नाथ भोसले मार्ग येथील विधी या निवासी इमारतीची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे. (कालावधी १ वर्ष) (अंदाजित रक्कम रुपये १६.८५ लक्ष)

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २७.०७.२०२६ ते दि. ०३.०८.२०२६ रोजी पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) दि. ०४.०८.२०२६ रोजी
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. काअ/एघवि/भांडार/ई-निविदा/४७८४/२६-२७.
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.)विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६.
दिनांक :- २१/७/२०२६

(उदय डी.पालवे)
कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक(सा.बां.)विभाग, मुंबई

आरओसी - 2026-27/क्र-5/C१८९९

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# समुद्राची परतफेड ! कचऱ्याने गुदमरल्या मुंबईच्या चौपाट्या

**■ भरतीसोबत दररोज ३०० ते ३५० मेट्रिक टन कचरा किनाऱ्यावर**
**■ जुहू चौपाटी सर्वाधिक प्रभावित, पालिकेसमोर मोठे आव्हान**

**■ मुंबई (राकेश गायकवाड) :** मुंबईची ओळख म्हणून जगभर प्रसिद्ध असलेले समुद्रकिनारे पावसाळ्यात कचऱ्याच्या विळख्यात सापडले आहेत. भरतीच्या वेळी समुद्रातून वाहून येणारा प्लास्टिक, थर्माकोल, बाटल्या, घरगुती कचरा आणि विविध प्रकारचा तरंगता कचरा थेट चौपाट्यांवर जमा होत असल्याने अनेक समुद्रकिनारे अक्षरशः डम्पिंग ग्राउंडचे स्वरूप धारण करत आहेत. दररोज सरासरी ३०० ते ३५० मेट्रिक टनांहून अधिक कचरा किनाऱ्यावर येत असून त्यातील सुमारे १५० मेट्रिक टन कचरा एकट्या जुहू चौपाटीवर जमा होत आहे. त्यामुळे पर्यावरणाबरोबरच पर्यटन आणि सार्वजनिक आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबईतील गिरगाव, दादर, जुहू, खार, सात बंगला, वेसावे, मार्वे, गोराई अशा समुद्रकिनाऱ्यांवर वर्षभर पर्यटकांची गर्दी असते. विशेषतः पावसाळ्यात समुद्राच्या लाटांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक येथे येतात. मात्र गेल्या काही वर्षांपासून प्रत्येक मान्सूनमध्ये या किनाऱ्यांवर प्लास्टिक आणि इतर घनकचऱ्याचे ढीग साचत



असल्याने पर्यटकांचा हिरमोड होत आहे. मुंबईतील नाले, नद्या आणि पावसाच्या पाण्याच्या प्रवाहातून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक व हलका कचरा समुद्रात जातो. भरतीच्या वेळी समुद्र हा सर्व कचरा पुन्हा किनाऱ्यावर फेकून देतो. परिणामी समुद्रकिनाऱ्यांवर दुर्गंधी, अस्वच्छता आणि प्रदूषणाचे चित्र निर्माण होते. या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने विविध नाल्यांच्या मुखाशी ट्रॅश बूम बसविले आहेत. काही वर्षांपूर्वी या यंत्रणेद्वारे तीन महिन्यांत तब्बल १०,५०० क्युबिक मीटर तरंगता कचरा अडवण्यात यश आले होते. तरीही मोठ्या प्रमाणातील कचरा समुद्रात जाणे थांबलेले नाही. दरवर्षी सुमारे ₹१५० कोटी खर्च करून नाले आणि नद्यांची साफसफाई केली जाते. मात्र एवढ्या मोठ्या खर्चानंतरही समुद्रात हजारो मेट्रिक टन कचरा पोहोचत असल्याने नालेसफाईच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित

**९ ते १९ जुलैदरम्यान समुद्रकिनाऱ्यांवरून उचललेला कचरा**

- ■ गिरगाव चौपाटी – ३३.६६ मेट्रिक टन
- ■ दादर–माहीम – १५२.१० मेट्रिक टन
- ■ चिंबई–वारिंगपाडा – १२७.२० मेट्रिक टन
- ■ मढ–मार्वे – ४४.२८ मेट्रिक टन
- ■ जुहू – १,८२५ मेट्रिक टन
- ■ वेसावे – २७७.६० मेट्रिक टन
- ■ गोराई – ३८.८२ मेट्रिक टन

होत आहे. तज्ज्ञांच्या मते, गाळ काढण्याबरोबरच पाण्यावर तरंगणारा प्लास्टिक व हलका कचरा पूर्णपणे हटवला जात नसल्याने तो पावसाच्या पाण्यासोबत थेट समुद्रात वाहून जातो. मुंबईतील अनेक नाल्यांच्या काठावर मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्या तसेच लघुउद्योग आहेत. येथून प्लास्टिक पिशव्या, घरगुती कचरा आणि औद्योगिक टाकाऊ वस्तू थेट नाल्यांमध्ये टाकल्या जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे समुद्र प्रदूषणासाठी केवळ प्रशासन नव्हे, तर नागरिकांची निष्काळजी वृत्तीही तितकीच कारणीभूत असल्याचे पर्यावरणप्रेमी सांगतात. महापालिका प्रशासनाने समुद्रात जाणारा कचरा रोखण्यासाठी अधिक प्रभावी पर्यावरणपूरक उपाययोजनांचा शोध सुरू केला आहे. समुद्रकिनारे स्वच्छ ठेवणे, खारफुटीचे संवर्धन करणे, प्लास्टिक समुद्रात पोहोचण्यापूर्वीच अडवणे आणि त्याची योग्य विल्हेवाट लावणे यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तयारी सुरू असल्याचे घनकचरा विभागाने स्पष्ट केले आहे. घनकचरा विभागाचे उपायुक्त किरण दिघावकर यांनी सांगितले की, पावसाळ्यात समुद्रकिनाऱ्यांवर साचणारा कचरा तातडीने उचलण्यासाठी प्रत्येक किनाऱ्यावर यंत्रणा आणि सफाई कर्मचारी तैनात केले जातात. त्यामुळे भरतीनंतर जमा होणारा कचरा रोजच्या रोज हटवण्याचा प्रयत्न केला जातो.

# भटक्या श्वानांच्या लसीकरणासाठी महापालिका–मिशन रेबीजचा करार



**■ मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबईतील भटके श्वान व मांजरींचे लसीकरणासाठी तसेच 'रेबीजमुक्त मुंबई' करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि वर्ल्डवाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस-होप/मिशन रेबीज इंडिया (WVS-HOPE/Mission Rabies India) यांच्यात महानगरपालिका मुख्यालय येथे सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करार अंतर्गत, ही संस्था मुंबईतील भटक्या कुत्र्यांचे रेबीज लसीकरण करण्यासाठी नि:शुल्क सेवा प्रदान करणार आहे, अशी माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी दिली. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनात हा सामंजस्य करार करण्यात आला. उप आयुक्त (विशेष) श्री. विनायक विसपुते, देवनार पशुवधगृहाचे महाव्यवस्थापक डॉ. कलीमपाशा पठाण, मिशन रेबीज इंडियाचे संचालक तसेच डब्ल्यूव्हीएस-होपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बालाजी चंद्रशेखर यांची यावेळी उपस्थिती होती. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यावेळी म्हणाल्या की, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग तसेच मत्स्यपालन आणि पशूसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने वर्ष २०३० पर्यंत श्वानांपासून होणाऱ्या रेबीज रोगाच्या निर्मुलनासाठी राष्ट्रीय कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. तथापि, भारतीय कल्याण मंडळ यांनी सुचवलेल्या मानक कार्यपद्धतीनुसार, सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी भटक्या श्वानांचे लसीकरण करून रेबीज निर्मूलनासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'रेबीजमुक्त मुंबई' करण्याच्या उद्देशाने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. या उपाययोजनेचा एक भाग म्हणून वर्ल्डवाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस-होप/मिशन रेबीज इंडिया (WVS-HOPE/Mission Rabies India) या संस्थेसोबत २०२६ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अंतर्गत, रेबीज आजाराविषयी जनजागृती व शिक्षण, रेबीज प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा प्रसार, भटक्या श्वानांचे मोठ्या प्रमाणावर रेबीज प्रतिबंधक लसीकरण (Mass Dog Vaccination) तसेच रेबीज सर्व्हिलन्स (Rabies Surveillance) उपक्रम राबविण्यात येणार आहे, असेही श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी सांगितले.

# मुंबईच्या पाणीपुरवठ्याचा 'लाईफलाइन' प्रकल्प वेगात



**■ मुंबई (नितीन देवळेकर) :** मुंबईच्या भविष्यातील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या कशेळी (भिवंडी) ते मुलुंड जकात नाका जलबोगदा प्रकल्पाची कामे निर्धारित वेळापत्रकानुसार आणि उच्च गुणवत्तेसह पूर्ण करावीत, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी दिले. तसेच, कामाचा वेग कायम ठेवत सुरक्षितता, गुणवत्ता आणि वेळेचे पालन करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकारी व अभियंत्यांना दिल्या. पाणी वितरण व्यवस्थेतील गळती कमी करून पाणीपुरवठा अधिक कार्यक्षम व सक्षम करण्याच्या उद्देशाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कशेळी महासंतुलन जलाशय ते कशेळी (भिवंडी) तसेच कशेळी ते मुलुंड जकात नाका या दरम्यान पाणी वहनासाठी दोन स्वतंत्र जलबोगद्यांच्या बांधकामाची कामे वेगाने प्रगतिपथावर आहेत. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी मुलुंड जकात नाका प्रकल्प कार्यस्थळास भेट देऊन कशेळी ते मुलुंड जलबोगदा कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर म्हणाले की, भातसा जलस्त्रोताचे पाणी हे मुंबई-II आणि मुंबई -III या दोन मुख्य जलवाहिन्यांद्वारे मुंबई महानगरापर्यंत आणले जाते. मुंबई महानगराची पिण्याच्या पाण्याची सतत वाढणारी मागणी लक्षात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कशेळी ते मुलुंड जकात नाक्यापर्यंत जलबोगदा बांधण्याचे निश्चित केले आहे.


**तृतीय संस्करण प्रक्रिया केलेले पाणी वाहून नेणाऱ्या जल बोगदा प्रकल्पाची पाहणी**



मुंबईतील तृतीय संस्करण (Tertiary Treatment) केलेल्या पाण्याचा पुनर्वापर वाढविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दोन महत्त्वाच्या जल बोगद्यांचे बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत घाटकोपर मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र ते भांडुप संकुल (पॅकेज-१) आणि धारावी मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र ते घाटकोपर मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र (पॅकेज-२) या दोन बोगद्यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी भांडुप संकुल येथील प्रकल्पस्थळाला भेट देऊन कामाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पाची प्रगती, कामाचा दर्जा आणि नियोजित वेळापत्रकाची माहिती घेतली. सद्यस्थितीत घाटकोपर मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र ते भांडुप मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र आणि भांडुप संकुल पर्यंत जमीनीखालून ११.६१ किलोमीटर लांबीचा व ४.१ मीटर व्यासाचा जलबोगद्याद्वारे भांडुप संकुल पर्यंतच्या प्रकल्पाचे काम हाती घेतले असून सदर कामातील तीन कूपकांपैकी (Shaft) भांडुप संकुल येथील कूपकाच्या (Shaft) १७५ मीटर खोलीपैकी १३६ मीटर, भांडुप मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र येथील कूपक (Shaft) १ च्या १५८ मीटर खोलीपैकी ८ मीटर व कूपक (Shaft) २ च्या १०८ मीटर खोलीपैकी २५ मीटर खोलीपर्यंतच्या उत्खन्नाचे काम झाले आहे. पुढील कामे वेगाने प्रगतिपथावर आहेत. सध्या भांडुप संकुल येथे जल बोगद्याच्या उभारणीसाठी आवश्यक कूप (Shaft) उत्खननाचे काम प्रगतिपथावर असून, ते नियोजनानुसार सुरू असल्याचे सांगण्यात आले. या बोगद्याच्या प्रत्यक्ष खणनाचे (Tunnel Boring) काम जानेवारी २०२७ पासून सुरू होणे अपेक्षित असल्याची माहिती श्री. अभिजीत बांगर यांनी दिली. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तृतीय संस्करण केलेले पाणी विविध औद्योगिक आणि बिगर-पेयजल वापरासाठी कार्यक्षमतेने वाहून नेता येणार असून, त्यामुळे शुद्ध पिण्याच्या पाण्यावरील ताण कमी होण्यास आणि मुंबईतील जलसंपत्तीचे अधिक शाश्वत व्यवस्थापन करण्यास मदत होणार आहे. प्रमुख अभियंता (पाणीपुरवठा प्रकल्प) श्री. चंद्रकांत चौधरी यांच्यासह संबंधित अभियंते, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# सरसकट पीओपी बंदी तूर्तास शक्य नाही; राज्य सरकारची भूमिका

**■ मुंबई (सम्यक कासारे) :** पर्यावरण समृद्धीच्या दिशेने जनजागृती सुरू असून लोकांचा आणि गणेशोत्सव मंडळांचाही त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.मात्र पीओपी बंदीचे उद्दिष्ट साध्य करण्यास आणखीन कालावधी लागेल, जुनी परंपरा असलेल्या गणेशोत्सवाचे स्वरूप एका रात्रीत बदलता येणार नाही.. गणेशोत्सवाची व्याप्ती पाहता परिस्थितीत बदल होण्यास थोडा अवधी लागेल. त्यामुळे गेल्यावर्षीचे आदेश याही वर्षी लागू करावेत अशी विनंती राज्य सरकारने हायकोर्टाकडे केली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पीओपी मूर्तीबाबत बदललेल्या भूमिकेला आव्हान देणारी याचिका ठाण्यातील पर्यावरण कार्यकर्ते रोहित जोशी यांनी ॲड.सुनीता भट्टाचार्य यांच्यामार्फत दाखल केली आहे तसेच शाडूच्या मातीच्या मूर्ती करणे याला आव्हान दिले आहे तर पीओपी मूर्तिकारांच्या संघटनेने देखील याचिका दाखल करत पीओपी बंदीमुळे आपल्या रोजगारावर गदा येत असल्याचा दावा केला आहे. या याचिकेवर



न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर गेले चार दिवस अंतिम सुनावणी सुरू आहे. आज झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल मिलिंद साठे यांनी बाजू मांडताना न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करत असल्याची माहिती हायकोर्टात सादर केली. तसेच मूर्तींकरता वापरण्यात आलेल्या पीओपीचा पुन्हा वापर करता येईल का?, याबाबत जाणकारांची समिती विचार करत आहे.यावर लवकरच तोडगा निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठ्या गणेशमूर्तींबाबत सध्यातरी नैसर्गिक स्त्रोतात विसर्जन करण्याशिवाय पर्याय नसल्याचे राज्य सरकारने यापूर्वीत स्पष्ट केले आहे. विसर्जनानंतर लगेच दुस-या दिवशी राज्यभरातील स्थानिक प्रशासनाला त्या नैसर्गित स्त्रोतातून पीओपीचा सारा मलबा गोळा करण्याचे निर्देश जारी करण्यात आल्याची माहिती यावेळी देताना पीओपी बंदीबाबत सुरू केलेल्या व्यापक जनजागृतीची माहितीही अडव्होकेट जनरल साठे यांनी सादर केली. गेल्यावर्षी ७००० च्या घरात मोठ्या गणेश मूर्ती बसवणा-या मंडळांची संख्या यंदा ४००० च्या घरात आहे. त्यामुळे लोकांमध्ये हळूहळू पर्यावरण संवर्धनाची भावना जागृत होत आहे . मात्र मुंबईसह राज्यातील गल्लीबोळात साजरा होणारा हा उत्सव केवळ आपल्या देशातच नाही तर परदेशातही साजरा केला जातो. तसेच परदेशातून खास गणेशोत्सवासाठी येणा-यांची संख्याही फार मोठीआहे . त्यामुळे याबाबत जनजागृती होण्यास थोड वेळ लागत असल्याने गेल्यावर्षीचे आदेश याही वर्षी कायम ठेवावेत अशी विनंती राज्य सरकारच्यावतीने केली. यावेळी खंडपिठाने सीपीसीबीच्या भुमिकेवर प्रश्नचिन्ह उभे करत तीव्र नाराजी व्यक्त केली.

# मुंबईच्या आरोग्य व्यवस्थेचा कायापालट; महापालिकेचा नवा मास्टर प्लॅन

**■ मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईतील नागरिकांना दर्जेदार, परवडणारी, सर्वसमावेशक आणि उत्तरदायी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध स्तरीय व्यापक धोरण तयार करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय बाबींशी संबंधित खात्यांना दिले आहेत. हे धोरण तयार करताना ते टप्पेनिहाय पद्धतीने तयार करावे आणि त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय) आधारित कार्यवाही, स्वच्छता, मनुष्यबळ व्यवस्थापन यासारख्या विविध बाबींचा धोरणात समावेश करावा, असेही निर्देश महापालिका आयुक्त श्रीमती भिडे यांनी दिले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय खात्यांची एक विशेष बैठक नुकतीच बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला मार्गदर्शन करताना श्रीमती भिडे बोलत होत्या. या बैठकीला अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा - लवंगारे, उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) श्री. शरद उघडे, उपायुक्त (महापालिका आयुक्त कार्यालय) श्री. प्रशांत गायकवाड, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालयांचे संचालक डॉ. श्री. शैलेश मोहिते, कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. श्रीमती दक्षा शहा आणि



संबंधित खात्यांचे अधिकारी उपस्थित होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध आरोग्य आणि वैद्यकीय सेवा सुविधा या अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने विविध स्तरीय सुधारणा टप्पेनिहाय पद्धतीने करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी आरोग्य व वैद्यकीय खात्यांना दिले आहेत.

**पहिला टप्पा**

या प्रस्तावित आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात महापालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय सेवा सुविधांच्या ठिकाणी नागरिकांची सनद प्रदर्शित करणे, रुग्णालय व दवाखान्यांमधील स्वच्छता व्यवस्थापन अधिकाधिक सक्षम व प्रभावी करणे, तक्रारींचे अधिक जलद गतीने निराकरण करणे, एच.एम.आय.एस. या संगणकीय प्रणालीची अधिक प्रभावी अंमलबजावणी करणे, रुग्णालयातील सेवा सुविधांबाबत सर्वसमावेशक डॅशबोर्ड कार्यान्वित करणे, 'स्मार्ट व डिजिटल ओपीडी' कार्यान्वित करून बाह्य रुग्ण कक्षात रुग्णांचा प्रतीक्षा कालावधी कमीत कमी करणे अशी उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य खात्याद्वारे देण्यात येणाऱ्या विविध अनुज्ञप्ती, परवाने (लायसन्स) इत्यादींची प्रक्रिया अधिक चांगल्या पद्धतीने राबविणे; ज्या नियम व अटींच्या आधारावर सदर अनुज्ञप्ती - परवाने देण्यात आले आहेत, त्या नियमांचे व अटींचे काटेकोरपणे पालन होते.

**दुसरा टप्पा**

या प्रस्तावित आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात निर्धारित करण्यात आलेल्या उद्दिष्टांमध्ये प्रायोगिक स्तरावर 'ऑनलाइन बेड अलोकेशन' अर्थात ऑनलाईन पद्धतीने रुग्णालयातील खाटा प्रतिक्षा यादीवरील गरजू रूग्णांना उपलब्ध करून देणे, रुग्णालयातील सेवांचे विकेंद्रीकरण करणे व यामध्ये प्रामुख्याने किरकोळ स्वरूपाच्या उपचारांसाठी रुग्णांना उपनगरीय रुग्णालयांकडे संदर्भित करणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात आठवड्याचे सातही दिवस व २४ तास सुरू राहणारा दवाखाना प्रायोगिक स्तरावर सुरू करणे या बाबींचा समावेश आहे. त्याचबरोबर गरजू रुग्णांना सार्वजनिक आणि खासगी सहकार्याने ५० टक्क्यांपर्यंत निधी उपलब्ध होण्यासाठी सर्वस्तरीय प्रयत्न करणे, रुग्णालयात सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वर्तणूक कौशल्ये (सॉफ्ट स्किल्स), वैद्यकीय नीतीशास्त्र आणि संबंधित बाबींचे प्रशिक्षण देणे; तर उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष पुरस्कार देणे यासारख्या बाबींचाही समावेश आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात करण्यात आला आहे.

**तिसरा टप्पा**

या प्रस्तावित आराखड्याच्या तिसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने 'गुणवत्ता निर्धारण' यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामध्ये एन. ए. बी. एच. ॲक्रेडिटेशन, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रमाणीकरण, सर्वसमावेशक आणि 'डिजिटल' तंत्रज्ञान आधारित बाबींचा समावेश करण्यात आला आहे. उत्कृष्टता व गुणवत्ता मानके या अंतिम टप्प्यात पात्र रुग्णांना विमा संरक्षण, अत्यावश्यक औषध उपलब्धता, आवश्यक पदे लवकरात-लवकर भरणे, दिव्यांगस्नेही आरोग्य सुविधा, सर्व महापालिका रुग्णालयांमधील खाटांचे अधिक प्रभावी व्यवस्थापन, सर्व कर्मचाऱ्यांना नैतिकता व सहानुभूती प्रशिक्षण, तसेच डॅशबोर्ड आणि हेल्थ कमांड सेंटर कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई.

दुरध्वनी क्र.- ०२२-२७५७१५३४ e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in

निविदा सुचना क्र. ०५ सन २०२६-२७
ई-निविदा सूचना

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई ४०० ६१४, योग्य निविदा धारकाकडून (कंत्राटदारांकडून) खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु. क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | तेरे गल्ली येथे अस्तित्वातील मासे सुकविण्याच्या ओटयाचे व जेटटीचे मजबूतीकरण करणे | रु. २,०९,१४,४७४/- |
| २ | महिकावती माहिम फिशरमेन्स सर्वोदय सहकारी सोसायटी, माहीम कोळीवाडा येथे उतरता धक्का (रॅम्प वाढविणे) | रु. १,८७,४०,३७८/- |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.२८/०७/२०२६ स. ११.३० ते ०५/०८/२०२६ दु.१४.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक :- दि ३१/०७/२०२६ स. ११.०० वा. मा.अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां मंडळ, ५वा मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.०६/०८/२०२६ दु.१५.०५ वा.

टिप- ई- निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
१. https://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक.

(एस एस पवार)
पत्तन अभियंता,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई


जा.क्र. पअउ/निविदा/१२०८
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन,नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक - २२/७/२०२६

आरओसी - 2026-27/क्र- 5/C१९२३

# मतदार यादीतील त्रुटींवर कात्री; घराघरांत पडताळणीचे आदेश

## एसआयआर मोहिमेला गती; पात्र मतदारांची नोंदणी आणि अपात्र नावे वगळण्यावर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचा भर

**ठाणे (तृप्ती गोरे) :** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा अपर मुख्य सचिव एस. चोक्कलिंगम यांनी दिले. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत वंचित राहू नये आणि अपात्र व्यक्तींची नावे मतदार यादीत कायम राहू नयेत, यासाठी संपूर्ण निवडणूक यंत्रणेने काटेकोरपणे काम करण्याचे आदेश त्यांनी दिले. भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय सुरू असलेल्या पुनरीक्षणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदार यादीची



विश्वासार्हता आणि पारदर्शकता टिकवण्यासाठी प्रत्येक स्तरावर जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. चोक्कलिंगम यांनी सांगितले की, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची भूमिका या संपूर्ण प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. बीएलओंनी घराघरांत जाऊन मतदारांची माहिती पडताळावी, गणना फॉर्म अचूक भरावेत तसेच आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून नोंदी अद्ययावत कराव्यात. प्राप्त अर्जांची वेळेत छाननी करून प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासही त्यांनी प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. मतदार नोंदणीस पात्र असलेल्या कोणत्याही नागरिकाचे नाव वगळले जाणार नाही, याची दक्षता घेण्याबरोबरच मृत, स्थलांतरित किंवा अपात्र मतदारांची नावे नियमानुसार वगळण्याची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. त्यामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि विश्वासार्ह होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशेष सखोल पुनरीक्षण हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मतदार यादीतील प्रत्येक नोंद अचूक असणे ही मुक्त, निष्पक्ष आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रियेची पूर्वअट असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे निवडणूक यंत्रणेतील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीत जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघांतील पुनरीक्षणाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. मतदार पडताळणीची प्रगती, अर्जांची छाननी, प्रलंबित प्रकरणे आणि बीएलओंच्या कामकाजाचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. ज्या ठिकाणी कामाची गती अपेक्षेपेक्षा कमी आहे, तेथे विशेष लक्ष देऊन निर्धारित वेळेत उद्दिष्टे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, निवडणूक शाखा आणि स्थानिक प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय राखून पुनरीक्षण प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यावरही भर देण्यात आला. प्रत्येक प्रकरणाची नियमित समीक्षा करून त्रुटी तातडीने दूर करण्याचे आदेश मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले. या बैठकीला ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने तसेच संबंधित मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

# ऐरोली बस स्थानकात पावसामुळे खड्डे


**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** मागील दोन दिवसांपासून चालू असलेल्या संततधार पावसामुळे ऐरोली बस स्थानकात खड्डे पडले आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचे शहरात ठिक ठिकाणी बस स्थानक आहेत. यामध्ये वाशी बस स्थानक



सर्वाधिक गर्दीचे ठिकाण आहे. अन्य स्थानक मधून त्या तुलनेत अल्प मार्ग चालू आहेत. यामध्ये कोपरखैरणे, ऐरोली, सारसोळे आदी स्थानकांचा समावेश आहे. पावसाळ्यापूर्वी काही बस स्थानकांमधील रस्ते खड्डेमुक्त करण्यात आले होते. त्यामुळे जून ते १५ जुलैपर्यंत प्रवाशांना दिलासा मिळाला होता; मात्र गेल्या काही दिवसांपासून शहरात संततधार पाऊस पडत आहे. त्यामुळे सीबीडी, नेरूळ, वाशी, तुर्भे येथील काही रस्ते, तसेच ऐरोली बस स्थानकात खड्डे पडले आहेत. या स्थानकात बस वळण्याचा ठिकाणी तसेच बाहेर पडण्याच्या ठिकाणी अनेक खड्डे पडले आहेत. यामुळे या ठिकाणाहून जाणाऱ्या पादचाऱ्यांना त्रास होत आहे. बस खड्ड्यात आदळली की प्रवाशांना मणक्याला मार बसत आहे. तसेच बस जवळून जाणाऱ्या पादचाऱ्यांच्या अंगावर घाण पाणी उडत आहे. खड्डे तात्पुरते दुरुस्ती साठी महापालिकेकडून अद्याप कोणतीही कार्यवाही चालू नाही. खडी आणि रेतीने तात्पुरते खड्डे भरून प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जात आहे.

# भिवंडीत वीजचोरीची दोन प्रकरणे उघड; मीटर बायपास व अवैध जोडणीतून महावितरणला ४.९७ लाखांचा फटका

**भिवंडी (विशाल कारंडे) :** भिवंडी शहरात वीजचोरीची दोन स्वतंत्र प्रकरणे उघडकीस आली असून, अवैध वीजजोडणी आणि मीटर बायपास करून महावितरण कंपनीची सुमारे ४ लाख ९७ हजार ३२२ रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये शांतीनगर पोलिसांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३५ अन्वये गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. पहिले प्रकरण शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जैतूनपुरा येथील शमा अरबी मदरशाजवळील घर क्रमांक ९९/८/२ येथे घडले. महावितरणच्या कर्मचारी आयुरी



ओंकार परवारकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अहमद रक्षा अन्सारी आणि मोहम्मद साहील अन्सारी यांनी कमी दाबाच्या (लो-व्होल्टेज) वीज खांबावरून दोन-कोर केबलद्वारे कोणतेही अधिकृत वीजमीटर न लावता थेट वीजजोडणी घेऊन वीजेचा वापर केला. तपासात १ फेब्रुवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत ९,१३७ युनिट वीजेचा बेकायदेशीर वापर झाल्याचे समोर आले असून, त्यामुळे महावितरणचे २ लाख ४३ हजार ९४७ रुपये ७८ पैसे इतके नुकसान झाल्याचा आरोप आहे. दुसरे प्रकरण कोटरगेट परिसरातील तीनबत्ती रोडवरील सुलेमान बिल्डिंग, घर क्रमांक १३६ येथे उघडकीस आले. महावितरणचे कर्मचारी वरद जगदीश चिगळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित आरोपीने अधिकृत वीजजोडणीतील केबलला अवैध तार जोडून वीजमीटर बायपास करत वीजचोरी केली. १४ मे २०२५ ते १३ मे २०२६ या कालावधीत ९,३१० युनिट वीजेचा बेकायदेशीर वापर करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून, त्यामुळे महावितरणला २ लाख ५३ हजार ३७४ रुपये २२ पैसे इतका आर्थिक फटका बसल्याचे सांगण्यात आले आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये शांतीनगर पोलिसांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हे दाखल केले असून, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. या दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रवींद्र आव्हाड करीत आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, या दोन्ही घटनांमध्ये मिळून १८,४४७ युनिट वीजचोरी झाल्याचा आरोप असून, त्यातून महावितरणचे ४ लाख ९७ हजार ३२२ रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान झाले आहे. प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# शहरातील १२० अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स व टपऱ्यांवर महापालिकेची कारवाई



**ठाणे (प्रथमेश चव्हाण) :** ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागामार्फत शहरात अनधिकृत पोस्टर्स व बॅनर्सविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत आज विविध प्रभागसमिती हद्दीत एकूण १२० अनधिकृत पोस्टर्स बॅनर्सवर कारवाई करण्यात आली. तर नौपाडा कोपरी येथे २ जणांवर तर दिवा प्रभाग समिती येथे ३ जणांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले. सदरची कारवाई ही सातत्याने सुरू राहणार असल्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. आतापर्यंत शहरातील २०१९

### प्रभागसमितीनिहाय अनधिकृत पोस्टर्स बॅनर्सवर करण्यात आलेली कारवाई

- नौपाडा कोपरी प्रभाग समिती : १३
- वागळे प्रभाग समिती : ०३
- लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती : ३१
- वर्तकनगर प्रभाग समिती : ११
- माजिवडा मानपाडा प्रभाग समिती : ३७
- उथळसर प्रभाग समिती : ०३
- दिवा प्रभाग समिती : २२

अनधिकृत पोस्टर्स बॅनरवर कारवाई करण्यात आली असल्याचे अतिक्रमण विभागाने नमूद केले. तसेच अनधिकृत पानटपऱ्यांवर देखील कारवाई करण्यात आली असून वागळे येथील दोन पानटपऱ्या तर ३ मटणशॉपवर तर लोकमान्य सावरकर येथील ४ पानटपऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून या टपऱ्यांवरील तंबाखूजन्य पदार्थ व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा शुभारंभ

# पालघरमध्ये दिव्यांगांना मोफत सहाय्यक साहित्याचे वितरण




**पालघर (रघुनाथ कदम) :** जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच शिवशक्ती सेवा फाउंडेशन, पालघर यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत दिव्यांगांसाठी मोफत सहाय्यक साहित्य वितरण कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (दि. २२) जननायक बिरसा मुंडा सभागृह, जिल्हा परिषद पालघर येथे करण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद, शिवशक्ती सेवा फाउंडेशनचे संयोजक राजेश दुबे, महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर तसेच दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. प्रकाश हसनाळकर उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत कुबड्या १५, वॉकर १५, व्हीलचेअर १४, इलेक्ट्रिक ट्रायसायकल १०, कृत्रिम हात-पाय २०, श्रवणयंत्रे ५५ आणि पांढऱ्या काठ्या २८ असे एकूण १५७ सहाय्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी १५४ दिव्यांगांची नोंदणी झाली असून कार्यक्रमात ७४ लाभार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. उर्वरित पात्र लाभार्थ्यांना साहित्य देण्याची प्रक्रिया सुरू आहे. कृत्रिम हात-पाय आवश्यक असलेल्या २० लाभार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले असून त्यांच्या गरजेनुसार कृत्रिम अवयव उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तसेच इलेक्ट्रिक ट्रायसायकलसाठी पात्र ठरलेल्या १० लाभार्थ्यांनाही लवकरच साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेमार्फत देण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिव्यांग व्यक्ती समाजाचा अविभाज्य घटक असून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने जगण्याचा आणि पुढे जाण्याचा समान अधिकार असल्याचे सांगितले. शिवशक्ती सेवा फाउंडेशन आणि दिव्यांग सक्षमीकरण विभागाने केलेल्या परिश्रमांचे त्यांनी कौतुक केले. वितरित करण्यात आलेले साहित्य दर्जेदार असून त्याचा लाभार्थ्यांना दैनंदिन जीवनात मोठा उपयोग होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच कर्णबधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्राचा प्रभावी वापर करता यावा यासाठी शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन करून आवश्यक तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले. राजेश दुबे यांनी दिव्यांग बांधवांना आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच मानत असल्याचे सांगून पालघर जिल्ह्यातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी भविष्यातही प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली. मनोज रानडे यांनी दिव्यांगांसाठी यूडीआयडी (UDID) कार्डचे महत्त्व अधोरेखित करताना भविष्यातील विविध शासकीय योजनांचा लाभ या कार्डाच्या माध्यमातून मिळणार असल्याने प्रत्येक पात्र दिव्यांगाने यूडीआयडी कार्ड काढण्याचे आवाहन केले. दिव्यांगांना सहजपणे सेवा उपलब्ध व्हावी यासाठी संबंधित विभाग तळमजल्यावर कार्यरत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शासन दिव्यांगांच्या पाठीशी ठामपणे उभे असून अशा उपक्रमांमुळे त्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ होईल, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. स्मिता सुधीर माळवदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेघा जाधव, कल्पिता जाधव, सुरेश चव्हाण, जयेश संखे तसेच पालघर जिल्ह्यातील दिव्यांग विद्यालयांचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कल्याण-डोंबिवलीत विनापरवाना पॉलीक्लिनिकवर छापा; १.०३ लाखांचा औषधसाठा जप्त करत FDAचा दणका

**डोंबिवली (सम्यक कासारे) :** रुग्णांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसायांवर लगाम घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने कल्याण-डोंबिवली परिसरात कारवाईचा धडाका सुरू केला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जुलै रोजी कल्याण पूर्वेतील खडेगोळवली परिसरातील एका पॉलीक्लिनिकवर अन्न व औषध प्रशासन आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी ₹१ लाख ३ हजार ६९० किमतीचा विनापरवाना ॲलोपॅथिक औषधसाठा जप्त केला असून, पुढील तपासासाठी त्यातील नमुने शासनाच्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात




आली. तपासणीदरम्यान पॉलीक्लिनिकमध्ये मोठ्या प्रमाणावर ॲलोपॅथिक औषधांचा साठा आढळून आला. मात्र, या औषधांची खरेदी, विक्री आणि साठवणूक करण्यासाठी आवश्यक असलेला कायदेशीर परवाना संबंधितांकडे नसल्याचे तपासात स्पष्ट झाले. परवाना नसताना औषधांचा साठा ठेवणे आणि त्यांचा वापर करून उपचार करणे हे औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा, १९४० मधील तरतुदींचे उल्लंघन असल्याने प्रशासनाने तातडीने कारवाई करत संपूर्ण औषधसाठा पंचनामा करून जप्त केला. या कारवाईमुळे बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या अनधिकृत आरोग्य सेवा केंद्रांवर प्रशासनाची करडी नजर असल्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या औषधसाठ्यातील दोन वेगवेगळ्या औषधांचे नमुने तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले असून, त्यांचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या पॉलीक्लिनिकमध्ये उपचारासाठी अनेक रुग्ण येत असल्याने त्यांना कोणताही आरोग्यविषयक धोका निर्माण झाला आहे का, याचाही तपास प्रशासनाकडून केला जाणार आहे. अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, परवाना नसताना औषधे विकणे, साठवणे किंवा रुग्णांवर उपचार करणे अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. अशा बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असून, कल्याण-डोंबिवली परिसरातील इतर पॉलीक्लिनिक, दवाखाने आणि मेडिकल स्टोअर्सचीही तपासणी करण्यात येणार आहे. रुग्णांच्या जीवाशी कोणत्याही प्रकारची तडजोड सहन केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी उपचारासाठी केवळ अधिकृत परवाना असलेल्या दवाखान्यांमध्येच जावे आणि संशयास्पद वैद्यकीय व्यवसाय अथवा औषधविक्रीबाबत तातडीने प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. या कारवाईमुळे आरोग्य क्षेत्रातील नियमांचे पालन अधिक काटेकोरपणे होण्यास आणि रुग्णांच्या सुरक्षिततेला प्राधान्य मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र. ३६ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१ दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामे **सा.बां. विभाग सुशिक्षित बेरोजगार अभियंता, यांचेसाठी मागवित आहेत.** कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयातून **दि. २४/०७/२०२६ ते दि. ३१/०७/२०२६ दुपारी १५.०० पर्यंत देण्यात येईल. भरुन पाठविलेल्या निविदा दि. ०३/०८/२०२६ रोजी त्यादिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचेनाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत(रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Internally plastering and painting to Plastic Surgery in Ellappa Balaram Building at Sir J.J. Group of Hospital's Campus, Mumbai. | ८२४९३१/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Repairs and Renovation to Flat No.18 on fourth floor in Swastik Doctor Quarters Building at Sir J.J. Group of Hospital's, Mumbai. | ८०८८३९/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Repairs and Renovation to Flat No.7 on first floor in Doctor Quarters Swastik Building at Sir J.J. Group of Hospital's, Mumbai. | ८१३९०६/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Repairs and Renovation to Flat No.14 on third floor in Doctor Quarter Trimurti Building at Sir J.J. Group of Hospital's, Mumbai. | ८१९६५४/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Repairs and Renovation to Flat No.8 on first floor in Doctor Quarters Trimurti Building at Sir J.J. Group of Hospital's. Mumbai. | ८११३५१/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Repairs and Renovation of inspection chamber and sewer line to OPD Building and Boys Hostel Building Area at J.J. Campus Road at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ७५४५३२/- | ८०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Repairs and Renovation of inspection chamber and sewer line to New Establishment Quarters Building and LN.E. College Area at J.J. Campus Road at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ७२६६०६/- | ८०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Repairs to front of Diavat rangmanch surrounding Area at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८२७६०८/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Repairs and Renovation of lift gate of Building No. 8 A and 8 B at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८१९४६९/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Repairs and Renovation of lift gate of Building No. 6 and 7 at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८१७११५/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ११ | Plastering, painting and repairing work at Hospital Building ward and OPD Building at Cama and Albless Hospital, Mumbai. | ६६३७५०/- | ७०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचेकार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/** ४९०८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
**दिनांक :** २६/७/२०२६.

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र- 5/C१८६५

# 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष थेट युरोपियन तरुणांच्या मुखातून



- नेदरलँड, जर्मनी, मलेशिया, मॉस्कोसह युरोपातील युवकांची वाघ्रण येथील श्री गणेश चित्रशाळेला भेट
- जाणून घेतला गणेशोत्सवाचा इतिहास, मूर्तीशिल्पकला आणि बाप्पाच्या आभूषणांचे महत्त्व

- वाघ्रणच्या श्री गणेश चित्रशाळेला परदेशी युवकांची भेट
- गणेशोत्सवाचा इतिहास आणि परंपरा जाणून घेतली
- बाप्पाच्या आभूषणांमागील धार्मिक महत्त्व समजून घेतले
- 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने दुमदुमली चित्रशाळा
- अलिबागच्या निसर्गाने परदेशी युवक भारावले

**रायगड ( सचिन कदम) :** महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणि गणेशभक्तीचे आकर्षण आता देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचले असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. नेदरलँड, जर्मनी, मलेशिया, मॉस्कोसह युरोपातील विविध देशांतून भारतभेटीवर आलेल्या युवकांनी अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील सुप्रसिद्ध श्री गणेश चित्रशाळेला भेट देत भारतीय संस्कृती, गणेशोत्सव आणि गणेशमूर्ती निर्मितीचा अनोखा वारसा जवळून अनुभवला. या भेटीदरम्यान परदेशी युवकांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे घुमलेला "गणपती बाप्पा मोरया!" चा जयघोष सर्वांचेच लक्ष वेधून घेत होता. गणेशोत्सव अवघ्या दीड महिन्यावर येऊन ठेपला असताना या युवकांनी श्री गणेश चित्रशाळेत तयार होत असलेल्या आकर्षक आणि देखण्या गणेशमूर्तींचे बारकाईने निरीक्षण केले. मूर्तिकार निर्भय अनंत धोदरे यांनी गणेशमूर्ती घडविण्याची संपूर्ण प्रक्रिया, मूर्तीतील कलात्मकता, पर्यावरणपूरक संकल्पना आणि पारंपरिक शिल्पकलेची वैशिष्ट्ये सविस्तर उलगडून सांगितली. भारतीय संस्कृती, सण-उत्सव, परंपरा, खाद्यसंस्कृती आणि सामाजिक जीवनशैलीचा अभ्यास करण्यासाठी भारतात आलेल्या या युवकांनी गणेश चतुर्थीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व जाणून घेण्याबरोबरच श्रीगणेशाच्या मुकुट, दागिने, अलंकार, शस्त्रे आणि विविध आभूषणांमागील ऐतिहासिक व आध्यात्मिक अर्थ जाणून घेण्यासाठी अनेक प्रश्न विचारले. मूर्तिकारांनी मराठीत दिलेल्या उत्तरांचे इंग्रजी भाषांतर ऐकल्यानंतर युवकांनी भारतीय संस्कृतीबद्दल प्रचंड आदर व्यक्त केला. प्रयास हॉस्पिटल, कार्लेखिंडचे डॉ. रवींद्र म्हात्रे यांनी या युवकांना भारतीय संस्कृती, गणेशोत्सवाची परंपरा आणि कोकणातील गणेशभक्तीची वैशिष्ट्ये समजावून सांगितली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे युवकांना गणेशोत्सवाचा व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक पैलू समजून घेता आला. श्री गणेश चित्रशाळेतील देखण्या आणि जिवंत भासणाऱ्या गणेशमूर्ती पाहून परदेशी युवक भारावून गेले. भेटीच्या शेवटी त्यांनी पुन्हा एकदा "गणपती बाप्पा मोरया" असा जयघोष करत भारतीय संस्कृतीप्रती आपला आनंद व्यक्त केला. या प्रसंगी मूर्तिकार निर्भय धोदरे, अनंत धोदरे, कृष्णा धोदरे आणि आकाश धोदरे यांनी युवकांना गणेशमूर्ती निर्मितीची माहिती दिली. तसेच गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ हरिश्चंद्र पाटील व हेमंत पाटील उपस्थित होते. लायन्स क्लबच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण उपक्रमांतर्गत हे युवक विविध देशांच्या संस्कृतीचा अभ्यास करत जगभर भ्रमंती करत आहेत. यावर्षी अलिबाग लायन्स क्लबच्या सदस्यांकडे त्यांचा मुक्काम असून डॉ. रवींद्र म्हात्रे आणि डॉ. रेखा म्हात्रे यांनी या युवकांना अलिबागमधील गणेश चित्रशाळेला भेट देण्याची संधी उपलब्ध करून दिली. भेटीनंतर युवकांनी अलिबागचा निसर्ग, हिरवाई, समुद्रकिनारे, डोंगररांगा आणि येथील शांत, प्रसन्न वातावरणाचे भरभरून कौतुक केले. भारतीय संस्कृतीचा हा अविस्मरणीय अनुभव आयुष्यभर स्मरणात राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# रायगडमधील ८ हजार ९१४ शेतकऱ्यांना कर्जमाफी



**रायगड (धनश्री सट्टा) :** नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस आणि शेतीमालाला मिळणारा कमी भाव यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत असून, या योजनेचा लाभ जिल्ह्यातील ८ हजार ९१४ पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे. जिल्ह्यातील पात्र कर्ज खात्यांची पडताळणी पूर्ण झाली असून त्यांची माहिती शासनाच्या कर्जमाफी पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत कर्जाची परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. त्यामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, केवळ थकीत कर्जदारांनाच नव्हे तर वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. रायगड जिल्ह्यात नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याने या योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या लक्षणीय असण्याची शक्यता आहे. राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांकडून घेतलेल्या पीक कर्जालाही या योजनेचा लाभ लागू होणार आहे. पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्राप्त झाल्यानंतर त्या संबंधित सेवा संस्था, ग्रामपंचायत, बँक शाखा, सहायक निबंधक आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांनी 'आपले सरकार' सेवा केंद्र किंवा संबंधित बँक शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कर्जमाफीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी दिली. कर्जमाफीसोबतच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ देण्याचा शासनाचा निर्णय हा आर्थिक शिस्तीला प्रोत्साहन देणारा ठरणार असून, जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना या योजनेतून मोठा आधार मिळणार आहे.

# पंढरीत २५ लाखांवर भाविक दाखल



**पंढरपूर (शकिल शेख) :** 'जाता पंढरीशी सुख लागे जीवा' या संतोक्तीनुसार लाखो भाविकांनी आषाढी एकादशीनिमित्त हजेरी लावली. आषाढी एकादशीचा सोहळा शनिवारी (दि. २५) भक्तिमय वातावरणात साजरा झाला. संतांच्या पालख्या रात्री पंढरपूर येथे दाखल झाल्या होत्या. सुमारे २५ लाख भाविक पंढरीत दाखल झाले होते. यामुळे पंढरीनगरी भाविकांनी दुमदुमली. पालख्यांचे प्रस्थान पंढरपूरच्या दिशेने होताच पावसानेही चांगली हजेरी लावली. राज्य, परराज्यांतून आलेल्या वैष्णवांमुळे पंढरीत भाविकांचा महासागर उसळला होता. पंढरपूर येथे आषाढी यात्रेकरीता एसटी, रेल्वे, खासगी वाहनांची तसेच पालख्यांबरोबर लाखोंच्या संख्येने भाविक दाखल झाले होते. साडेपाच हजार जादा बसेस आषाढीकरीता सोडल्या होत्या. जादा रेल्वे गाड्यादेखील धावत होत्या. खासगी वाहनानेदेखील भाविक मोठ्या संख्येने आले होते. १८ ठिकाणी पार्किंग व्यवस्था होती. दशमीदिवशी चंद्रभागा नदीचे वाळवंट, भक्तीसागर ६५ एकर, मंदिर परिसर, स्टेशन रोड, भक्ती मार्ग, प्रदक्षिणा मार्ग भाविकांनी फुलून गेला होता. दर्शन रांग मंदिरापासून पत्राशेडच्या पुढे गोपाळपूर येथून पुढे रांझणी रस्त्यावर १५ किमी पर्यंत गेली होती. दर्शन रांगेत चार लाखांहून अधिक भाविक दाखल झालेले होते. ६५ एकर भक्तीसागरात सहा लाखांहून अधिक भाविक वास्तव्य करत होते. येथील तंबू, राहुट्यांमध्ये भजन, कीर्तन व प्रवचनात भाविक दंग झाले होते. यंदा भाविकांची संख्या अपेक्षेपेक्षा जास्त वाढली होती. त्यामुळे दर्शन रांग १५ किमी अंतरावर पोहोचली होती. दर्शन रांगेतील भाविकांना पदस्पर्श दर्शनासाठी किमान १८ तासांचा कालावधी लागत होता. एका मिनिटाला साधारणपणे ४० भाविकांना पदस्पर्श दर्शन मिळत होते. आणखी दर्शन रांग पुढे पुढे सरकत चालली होती. दर्शन रांगेत २० दर्शन शेड उभारले होते. मुख दर्शन रांगही मंदिरापासून विठ्ठल अन्नक्षेत्रापासून पुढे संभाजी महाराज पुतळा ते काळा मारुती ते पुढे गोपाळपूर रोडकडे मुख दर्शन रांग पोहोचली होती. मुख दर्शनासाठीदेखील किमान ५ तासाचा कालावधी लागत होता. व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आल्याने दर्शन रांग लांबल्याचे चित्र दिसत होते. भाविकांच्या उपस्थितीने शहरातील व उपनगरांतील मठ, मंदिर, भक्त निवास हाऊस फुल्ल झाले होते. मठ, मंदिरातून भाविक भजन, कीर्तन करण्यात दंग असल्याचे चित्र दिसून आले. यात्रेपूर्वी चंद्रभागा नदीत मुबलक पाणी सोडण्यात आले होते. यामुळे भाविकांना स्नान करता आले, तर या ठिकाणी अनूचित प्रकार घडू नयेत म्हणून जीवरक्षक दलाच्या स्पीड बोटी तैनात करण्यात आलेल्या होत्या. दोनशे होडी तैनात करण्यात आल्या होत्या. दहा हजार पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आलेले होते.

# पोलीस दलात २३ हजारांहून अधिक पदे रिक्त



**नागपूर (नितीन देवळेकर) :** महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्या पोलीस दलासमोर मनुष्यबळाची गंभीर समस्या उभी राहिली आहे. माहिती अधिकारातून समोर आलेल्या आकडेवारीनुसार, ३० जून २०२६ अखेर राज्यातील पोलीस दलातील मंजूर २ लाख २५ हजार ४६१ पदांपैकी तब्बल २३ हजार ३२० पदे रिक्त आहेत. विशेष म्हणजे, पोलीस शिपाई आणि पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) या प्रत्यक्ष मैदानात काम करणाऱ्या संवर्गातच सर्वाधिक रिक्त जागा असल्याने वाढत्या गुन्हेगारी आणि लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही माहिती 'असोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' (आसरा) संस्थेचे अध्यक्ष संजय थुल यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविली होती. महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयातील जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक सतीश जाधव यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार, राज्यात सध्या २ लाख २ हजार १४१ कर्मचारी कार्यरत असून उर्वरित पदे अद्याप भरली गेलेली नाहीत. सर्वाधिक रिक्त पदे पोलीस शिपाई संवर्गात आहेत. या संवर्गातील १ लाख २६ हजार ७०९ मंजूर पदांपैकी १ लाख १० हजार १९३ पदे भरलेली असून १६ हजार ५१६ पदे रिक्त आहेत. यानंतर पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) संवर्गात ११ हजार ८८४ मंजूर पदांपैकी केवळ ९ हजार ६ अधिकारी कार्यरत असून २ हजार ८७८ पदे रिक्त आहेत. सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) संवर्गात १ हजार ५६२ पदे रिक्त असून, मंजूर २० हजार ११९ पदांपैकी १८ हजार ५५७ पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत. सहायक पोलीस निरीक्षक (एपीआय) संवर्गात ४ हजार ७७९ मंजूर पदांपैकी २८७ पदे रिक्त आहेत, तर पोलीस निरीक्षक संवर्गातील ४ हजार २५३ पदांपैकी ५२१ पदे अद्याप भरायची आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्तरावरही रिक्त जागा चिंतेचा विषय ठरत आहेत. पोलीस उपअधीक्षक (डीवायएसपी) संवर्गातील ९७२ मंजूर पदांपैकी १८५ पदे रिक्त आहेत. पोलीस अधीक्षक ते पोलीस महासंचालक या वरिष्ठ संवर्गातही ४५४ मंजूर पदांपैकी ३० पदे रिक्त असल्याचे आकडेवारीत स्पष्ट झाले आहे. दरम्यान, पोलीस हवालदार संवर्गात मंजूर पदांपेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असल्याचे या माहितीत नमूद करण्यात आले आहे. २५ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार पोलीस नाईक पदाचा हवालदार संवर्गात समावेश करण्यात आल्यामुळे दोन्ही संवर्गांतील एकूण ६१ हजार ७० मंजूर पदांच्या तुलनेत ६२ हजार ९५० कर्मचारी कार्यरत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. 'आसरा' संस्थेचे अध्यक्ष संजय थुल यांनी राज्यातील वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण, बदलते गुन्हेगारीचे स्वरूप आणि पोलीस दलावरील वाढता कामाचा ताण लक्षात घेता ही रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या निकषानुसार प्रति एक लाख लोकसंख्येमागे २२२ पोलीस उपलब्ध असावेत, या प्रमाणापर्यंत पोहोचण्यासाठी राज्यातील मंजूर पदसंख्या वाढविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. यासंदर्भात शासनाकडे निवेदनही सादर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील पोलीस भरती प्रक्रिया वेगाने राबवून रिक्त पदे भरल्यास कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**ठळक आकडेवारी**

- मंजूर पदे : २,२५,४६१
- कार्यरत कर्मचारी : २,०२,१४१
- रिक्त पदे : २३,३२०
- पोलीस शिपाई रिक्त : १६,५१६
- पीएसआय रिक्त : २,८७८
- एएसआय रिक्त : १,५६२
- पोलीस निरीक्षक रिक्त : ५२१
- एपीआय रिक्त : २८७
- डीवायएसपी रिक्त : १८५

# मालाड खाडीत देशातील पहिला 'इंटरसेप्टर' प्रकल्प; समुद्रात जाण्यापूर्वीच प्लास्टिक कचरा अडवणार




**मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईतील नद्या, नाले आणि खाड्यांमधून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक तसेच इतर तरंगता कचरा अरबी समुद्रात वाहून जात असल्याने सागरी पर्यावरणासमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. या वाढत्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने मालाड खाडी येथे 'द ओशन क्लीनअप' या जागतिक स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून अत्याधुनिक 'इंटरसेप्टर' पायलट प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका, 'प्लास्टिक फिशर', 'युनायटेड वे मुंबई' आणि 'द ओशन क्लीनअप' यांच्या संयुक्त सहकार्याने हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत मालाड आणि ट्रॉम्बे खाडी परिसरात आधुनिक 'इंटरसेप्टर' तंत्रज्ञानाचा वापर करून नदी-नाल्यांमधून समुद्राकडे वाहून जाणारा प्लास्टिक व इतर तरंगता कचरा समुद्रात पोहोचण्यापूर्वीच अडवून संकलित केला जाणार आहे. 'द ओशन क्लीनअप' संस्थेच्या अभ्यासानुसार, मुंबई शहरातून दरवर्षी सुमारे ५० लाख किलो प्लास्टिक कचरा अरबी समुद्रात वाहून जातो. त्यामुळे समुद्रातील जैवविविधता, सागरी जीवसृष्टी आणि किनारी परिसंस्थेवर मोठा विपरीत परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर समुद्रातील प्रदूषण रोखण्यासाठी आणि प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे. विशेष म्हणजे, प्रायोगिक टप्प्यात 'इंटरसेप्टर' प्रणालीद्वारे कचरा संकलनाची सेवा बृहन्मुंबई महानगरपालिकेला पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून दिली जाणार असल्याने पालिकेच्या सार्वजनिक निधीची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. अलीकडील मुसळधार पाऊस आणि समुद्रातील उधाणाच्या भरतीदरम्यान जुहू समुद्रकिनाऱ्यावर हजारो टन प्लास्टिक व इतर कचरा वाहून आल्याचे चित्र समोर आले होते. नदी-नाल्यांमधून समुद्रात गेलेला कचरा भरतीच्या वेळी पुन्हा किनाऱ्यावर येत असल्याने समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता बिघडते, सागरी जीवसृष्टी धोक्यात येते आणि हा कचरा हटवण्यासाठी महापालिकेला कोट्यवधी रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागतो. या पार्श्वभूमीवर कचरा समुद्रात पोहोचण्यापूर्वीच अडवण्याची 'इंटरसेप्टर' प्रणाली अत्यंत प्रभावी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने नदी-नाल्यांमधील तरंगता कचरा नियमितपणे संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावता येणार आहे. परिणामी समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी होण्यास, किनाऱ्यांची स्वच्छता राखण्यास, सागरी जैवविविधतेचे संरक्षण करण्यास आणि पर्यावरण संवर्धनाला चालना मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

# वसई नालासोपारा आगारांच्या ताफ्यात आठ नव्या गाड्या



**वसई (सुचिता देशमुख) :** वसई बस आगारात तीन नव्या राजमाता जिजाऊ बस आणि नालासोपारा बस आगारात पाच नव्या एसटी बसेस, अशा वसई तालुक्यातील एसटी महामंडळाच्या ताफ्यात आठ नव्या बस दाखल झाल्या आहेत. त्यामुळे प्रवासीवर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. वसई तालुक्याचा शहरी तसेच ग्रामीण भागातील बहुतांश नागरिक एसटी महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करतात. यात प्रामुख्याने शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच नोकरदार वर्गाचा मोठा समावेश आहे. मात्र, गेल्या काही काळापासून अनेक मार्गांवर जुन्या व खिळखिळ्या झालेल्या बसेस धावत असल्याने प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत होता. तसेच लांब पल्ल्याचा प्रवासही अतिशय गैरसोयीचा ठरू लागला होता. प्रवाशांची हीच अडचण लक्षात घेऊन एसटी प्रशासनाकडून नवीन बसेसची मागणी करण्यात आली होती. याच पार्श्वभूमीवर वसई आणि नालासोपारा बस आगारात आठ नव्या बसेस दाखल झाल्यामुळे प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे. नुकतेच आमदार राजन नाईक यांच्या हस्ते नालासोपारा बस आगारात पाच नव्या एसटी बसचे उद्घाटन करण्यात आले. तर शुक्रवारी आमदार स्नेहा दुबे पंडित यांच्या हस्ते ४० आसनांच्या तीन नव्या राजमाता जिजाऊ बसेसचे उद्घाटन करण्यात आले. जिल्ह्यांतर्गत वाहतुकीसाठी या नव्या बसचा वापर केला जाणार असल्याची माहिती, बसआगार व्यवस्थापकांनी दिली.

# तोट्यातील पीएमपीएमएलला सुधारणांचा डोस; चार वर्षांत उत्पन्नात १२० टक्के वाढीचा प्रशासनाचा दावा



**पुणे (अभिजीत येरल्लू) :** पीएमपीएमएल तोट्यात असली तरी सेवा सुधारण्यासाठी व्यापक पावले उचलली जात असून, गेल्या चार वर्षांत उत्पन्नात तब्बल १२० टक्क्यांची वाढ झाली आहे. शहराला आवश्यक असलेल्या सहा हजार बसच्या तुलनेत सध्या केवळ १,९६४ बस उपलब्ध असून, पुढील काळात दोन हजार नव्या बस ताफ्यात दाखल होणार आहेत. ब्रेकडाऊन रोखण्यासाठी कडक यंत्रणा, ठेकेदारांकडून ४१ कोटींचा दंड, स्मार्ट बसथांबे आणि डिजिटल सेवांसह सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी १२,९०० कोटी रुपयांचा दीर्घकालीन आराखडा तयार करण्यात येत आहे. आमच्यात अनेक त्रुटी असून, काम करण्यास आम्हाला संधी द्यावी, अशी मागणी पीएमपीएमएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी बुधवारी महापालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत दिली. महापालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत पीएमपीएमएलवर नगरसेवकांनी केलेल्या टीका-टिप्पणीला उत्तर देताना अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी पीएमपीएमएलची सविस्तर बाजू मांडली. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही नफा कमावण्यासाठी नसून, नागरिकांना सेवा देण्यासाठी असल्याचे स्पष्ट करत, उत्पन्नात लक्षणीय वाढ, बससेवेत सुधारणा आणि कार्यक्षमतेत वाढ झाल्याचा दावा त्यांनी आकडेवारीसह केला. आव्हाड म्हणाले, पीएमपीएमएलचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अधिकाऱ्यांसह नियमित बसने प्रवास करून प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास करण्यात आला. नगरसेवकांनी मांडलेल्या सूचनांमुळे विविध भागांतील वास्तव समजण्यास मदत झाली असून, त्या गांभीर्याने घेतल्या जातील. शहराची लोकसंख्या एक कोटी तीन लाखांहून अधिक असून, जागतिक निकषानुसार किमान सहा हजार बसची गरज आहे. मात्र, सध्या पीएमपीएमएलकडे १,९६४ बस असून, त्यापैकी १,३०६ भाडेतत्त्वावरील तर ६५८ स्वतःच्या आहेत. पुढील काळात केंद्र शासनाकडून एक हजार इलेक्ट्रिक आणि यावर्षी एक हजार सीएनजी बस ताफ्यात दाखल होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आर्थिक स्थितीबाबत बोलताना त्यांनी २०२१-२२ मध्ये ३७२ कोटी रुपये असलेले उत्पन्न २०२५-२६ मध्ये ८१८ कोटी रुपयांवर पोहोचल्याने तब्बल १२० टक्क्यांची वाढ झाल्याचे सांगितले. त्याच काळात खर्च १,०९१ कोटींवरून १,६१० कोटी रुपयांपर्यंत गेला असला तरी वाढ केवळ ४७ टक्के असल्याचा दावा त्यांनी केला. कर्मचाऱ्यांचे वेतन, इंधन, देखभाल आणि भाडेतत्त्वावरील बस यांवरच बहुतांश खर्च होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पीएमपीएमएलचे तिकीट आणि पासमधून ७२० कोटी, तर जाहिराती व इतर स्रोतांमधून ९८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याची माहिती देत, उत्पन्न सातत्याने वाढत असल्याचे आव्हाड यांनी नमूद केले. बससेवा पूर्णपणे निकृष्ट असल्याचा आरोप योग्य नसून, अनेक कार्यक्षमतेच्या निकषांवर सुधारणा झाल्याचे त्यांनी सांगितले. अपघातांचे प्रमाण प्रतिएक लाख किलोमीटरमागे लक्षणीयरीत्या घटले असले तरी ब्रेकडाऊनचे प्रमाण अद्याप चिंतेचा विषय असल्याची कबुली व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी दिली. उपलब्ध संसाधनांचा अधिकाधिक वापर करून रस्त्यावर धावणाऱ्या बसांची संख्या आणि शेड्यूल वाढविण्यात यश आल्याचा दावा करत, पीएमपीएमएलमधील त्रुटी दूर करण्यासाठी टप्प्याटप्प्याने सुधारणा सुरू असल्याचे त्यांनी सभागृहाला आश्वस्त केले. २०३४ पर्यंत आठ हजार बसचा ताफा उभारण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी डेपो, टर्मिनल, चार्जिंग स्टेशन आणि इतर पायाभूत सुविधांसह १२,९०० कोटी रुपयांचा व्यापक आराखडा तयार करण्यात आला आहे. "नगरसेवकांनी उपस्थित केलेले प्रश्न योग्य आहेत. उणिवा दूर करून पीएमपीएमएलला अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवाशाभिमुख करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे," असे सांगत व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी सभागृहाला सुधारणा प्रक्रियेची ग्वाही दिली.

# "माझ्या मुलांनी अभिजीत दिपकेसारखे निर्भीड व्हावे"; ज्योतिकाची आंदोलनाला जाहीर साथ



**वृत्तसंस्था :** देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणावरून सुरू असलेल्या आंदोलनाला आता मनोरंजन क्षेत्रातूनही मोठा पाठिंबा मिळू लागला आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला साऊथ अभिनेत्री ज्योतिकाने सोशल मीडियावरून खुला पाठिंबा दिला आहे. ज्योतिकाने आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजीत दिपके, पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि विद्यार्थी नेते सौरव दास यांचा विशेष उल्लेख केला. "धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि देशाच्या शिक्षणव्यवस्थेच्या सुधारणेसाठी मी या आंदोलनाच्या पाठीशी उभी आहे," असे तिने पोस्टमध्ये म्हटले आहे. तिने पुढे भावनिक शब्दांत प्रतिक्रिया देताना लिहिले की,

"एक आई म्हणून मला माझ्या मुलांना तुमच्यासारखे घडवायला आवडेल. अभिजीत दिपके, सोनम वांगचुक आणि सौरव दास यांनी निर्भयपणे उभे राहून तरुण पिढीला प्रेरणा दिली आहे. जेन झीचा मला अभिमान आहे. तुम्ही दाखवून दिले आहे की, एकत्र आल्यावर भारत अधिक मजबूत बनतो."

ज्योतिकाच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अनेकांनी तिच्या भूमिकेचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मिळणारा हा नैतिक पाठिंबा महत्त्वाचा असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे, मराठमोळ्या अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाचा उल्लेख करून त्यांच्या धाडसाचे कौतुक करणारी ही पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे.




# 'भाई, क्या कर दिया!'; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर अभिजीत दिपकेंचा व्हिडीओ शेअर करत सोनाक्षी सिन्हाचा सलाम

**वृत्तसंस्था :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सोशल



मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत असताना बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा हिने केलेली इन्स्टाग्राम स्टोरी विशेष चर्चेत आली आहे. प्रधान यांच्या राजीनाम्याची बातमी समोर आल्यानंतर आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजीत दिपके यांच्या आनंद व्यक्त करणाऱ्या क्षणाचा व्हिडीओ तिने शेअर करत "भाई, क्या कर दिया!" असे कॅप्शन दिले आहे. त्यामुळे हा व्हिडीओ आणि सोनाक्षीची प्रतिक्रिया सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये सोनाक्षीने अभिजीत दिपके यांचा व्हिडीओ पोस्ट केला असून, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची माहिती मिळताच दिपके भावूक झाल्याचे आणि आंदोलनकर्त्यांसोबत जल्लोष करतानाचे दृश्य त्यात दिसत आहे. या पोस्टसोबत तिने "भाई, क्या कर दिया!" असा छोटा पण लक्षवेधी संदेश लिहिला आहे. तसेच पार्श्वभूमीला लोकप्रिय 'धुरंधर' चित्रपटातील गाणेही जोडल्याने ही स्टोरी अधिक चर्चेचा विषय ठरली आहे. नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण उघडकीस आल्यानंतर देशभरातून शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी अनेक विद्यार्थी संघटना आणि आंदोलनकर्त्यांकडून सातत्याने करण्यात येत होती.

# 'अच्छा चलता हूं...'; विजय वर्माची सूचक पोस्ट चर्चेत



**वृत्तसंस्था :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अभिनेता विजय वर्मा याने सोशल मीडियावर केलेली एक क्रिप्टिक पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. इन्स्टाग्रामवर धर्मेंद्र प्रधान यांचा फोटो शेअर करत त्याने "अच्छा चलता हूं, दुआओं में याद रखना..." असे कॅप्शन दिले. या एका ओळीमुळे सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आले असून पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. विजय वर्माच्या पोस्टवर चाहत्यांनी मजेशीर तसेच राजकीय प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी ही पोस्ट प्रधान यांच्या राजीनाम्यावरची अप्रत्यक्ष प्रतिक्रिया असल्याचे म्हटले, तर काहींनी आंदोलनकर्त्यांच्या विजयाशी तिचा संबंध जोडला. नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी देशभरात जोर धरत होती. दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी पाठिंबा दिला होता. विजय वर्माही या आंदोलनाच्या समर्थनार्थ भूमिका घेत असल्याची चर्चा यापूर्वीही झाली होती.

# मधुमेहींनी पावसाळ्यात काय काळजी घ्यावी?


**वृत्तसंस्था :** पावसाळा हा ऋतू प्रत्येकासाठीच आल्हाददायक असतो, मात्र मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी हा काळ आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक ठरू शकतो. दमट वातावरण आणि दूषित पाणी यांमुळे मधुमेही रुग्णांना पायांचे गंभीर संसर्ग होण्याचा धोका कैक पटींनी वाढतो. रक्तातील साखरेचे अनियंत्रित प्रमाण आणि पायांची दुर्लक्षित स्वच्छता यांमुळे लहानशी जखमही मोठ्या समस्येचे रूप घेऊ शकते. पावसाळ्यातील दूषित पाण्यातून जीवाणू किंवा बुरशीजन्य संसर्ग झाल्यास तो थेट हाडांपर्यंत पोहोचण्याचा आणि गँगरीन होण्याचा धोका असतो. त्यामुळे रुग्णांनी दररोज रात्री झोपण्यापूर्वी आपले पाय, विशेषतः बोटांमधील फटी आणि तळपाय व्यवस्थित तपासावेत. तळपाय पाहण्यासाठी आरशाचा वापर करावा. कुठेही लालसरपणा, सूज, ओरखडा किंवा पांढरी पडलेली त्वचा दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू



नये. पाऊस किंवा घामामुळे पाय ओले झाल्यास ते स्वच्छ पाण्याने आणि जंतुनाशक साबणाने धुवावेत. त्यानंतर मऊ टॉवेलने पाय पूर्णपणे कोरडे करावेत. बोटांच्या दरम्यान असलेला ओलावा बुरशीला आमंत्रण देतो, म्हणून तिथे अँटी-फंगल पावडरचा वापर करावा. मात्र, बोटांच्या फटींमध्ये मॉइश्चरायझर लावणे टाळावे. पावसाळ्यात कधीही उघड्या पायाने किंवा चपलांशिवाय चालणे टाळावे. घरातही चपला वापराव्यात. प्लास्टिक किंवा रबराच्या घट्ट चपलांमुळे पायाला फोड येऊ शकतात. त्यामुळे वॉटरप्रूफ, मऊ आणि पायाला पूर्ण संरक्षण देणारे बूट वापरावेत. बूट घालण्यापूर्वी ते आतून कोरडे आहेत की नाही, याची खात्री करून घ्यावी. पायाला घाम येऊ नये म्हणून नेहमी स्वच्छ आणि सुती सॉक्स वापरावेत. ओले झालेले सॉक्स जास्त वेळ घालून ठेवल्यास संसर्ग वेगाने पसरतो. मधुमेही रुग्णांनी पायाची नखे कापताना ती जास्त खोलवर कापू नयेत, कारण नखांच्या कोपऱ्यात जखम होऊन इन्ग्रोन नेलचा संसर्ग होऊ शकतो. पायाला कोणताही फोड आला, त्वचा काळी पडू लागली, जखमेतून पू येऊ लागला किंवा पायाला सूज येऊन ताप आला, तर घरगुती उपाय न करता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अनिवार्य आहे.

# रोहित-गंभीर वादावर BCCIचा पूर्णविराम; 'निवृत्ती नाही, बदलाचाही प्रश्न नाही'





**वृत्तसंस्था :** भारतीय क्रिकेटमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्याबाबतच्या चर्चांवर अखेर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) स्पष्ट भूमिका मांडली आहे. रोहित शर्मा वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेणार, तसेच गौतम गंभीर यांची मुख्य प्रशिक्षकपदावरून उचलबांगडी होणार, अशा अफवा सोशल मीडियावर आणि विविध माध्यमांत रंगत होत्या. मात्र, BCCIचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी या सर्व चर्चांना स्पष्ट शब्दांत फेटाळून लावत, संघात कोणताही मोठा बदल होणार नसल्याचे सांगितले आहे. इंग्लंड दौऱ्यादरम्यान रोहित शर्मा अखेरचा वनडे सामना खेळून निवृत्ती जाहीर करणार असल्याच्या बातम्यांनी जोर धरला होता. तसेच त्याच्यावर निवृत्तीचा निर्णय घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्याही चर्चा सुरू होत्या. मात्र, या सर्व चर्चांना रोहितने मैदानातच दमदार उत्तर दिले. तिसऱ्या वनडे सामन्यात त्याने १३८ धावांची शानदार खेळी करत टीकाकारांची बोलती बंद केली. त्याचबरोबर २०२७ च्या वनडे विश्वचषकात खेळण्याची इच्छाही त्याने स्पष्ट केली. दुसरीकडे, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या जागी व्हीव्हीएस लक्ष्मण यांची नियुक्ती होणार असल्याचे वृत्तही समोर आले होते. मात्र, राजीव शुक्ला यांनी या चर्चांनाही कोणताही आधार नसल्याचे स्पष्ट केले. आग्रा येथे यूपी टी-२० लीगच्या चौथ्या हंगामाच्या मिनी लिलावाच्या उद्घाटनावेळी पत्रकारांशी बोलताना शुक्ला म्हणाले, "रोहित शर्मा आमच्या संघाचा महत्त्वाचा भाग आहे आणि तो खेळत आहे. त्याच्या निवृत्तीचा प्रश्नच उद्भवत नाही. सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांवर विश्वास ठेवू नका." त्यांनी पुढे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार शुभमन गिल यांच्यावरही पूर्ण विश्वास व्यक्त केला. "संघात कोण राहणार आणि कोण नाही, याचा निर्णय निवड समिती घेते. भारतीय संघ सध्या चांगली कामगिरी करत आहे आणि सातत्याने सामने जिंकत आहे. त्यामुळे सध्या कोणताही बदल करण्याची गरज नाही," असे शुक्ला यांनी स्पष्ट केले. BCCIच्या या भूमिकेनंतर रोहित शर्माच्या निवृत्तीच्या आणि गौतम गंभीर यांच्या पदावरील बदलाच्या चर्चांना पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. इंग्लंड दौऱ्यातील भारतीय संघाच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करताना संघ व्यवस्थापन सध्याच्या नेतृत्वावरच विश्वास कायम ठेवणार असल्याचे BCCIने स्पष्ट संकेत दिले आहेत.

# फुगडी'नंतर पाया का पडतात वारकरी? भक्ती, समता आणि नम्रतेचा अनोखा संस्कार



**वृत्तसंस्था :** आषाढी वारी ही केवळ पंढरपूरपर्यंतची पायी यात्रा नाही, तर ती भक्ती, समता, प्रेम आणि मानवतेचा जिवंत उत्सव आहे. लाखो वारकरी पावसाची, उन्हाची किंवा थकव्याची पर्वा न करता विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन होऊन पंढरीची वाट चालतात. या प्रवासात भजन, कीर्तन, टाळ-मृदंगाचा गजर आणि फुगडी यांमुळे वारीचा उत्साह अधिकच खुलतो. मात्र, फुगडी संपल्यानंतर वारकरी एकमेकांच्या पाया पडतात, ही परंपरा अनेकांना कुतूहल वाटणारी आहे. या कृतीमागे केवळ शिष्टाचार नसून वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा दडलेला आहे.

**'तुझ्यात विठ्ठल, माझ्यात विठ्ठल' हीच भावना**

वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र आहे – "भेदाभेद अमंगळ." प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचा अंश आहे, अशी श्रद्धा वारकऱ्यांची असते. त्यामुळे दोन वारकरी फुगडी खेळताना ते एकमेकांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहत नाहीत, तर समोरच्या व्यक्तीत साक्षात विठ्ठलाचे दर्शन घेतात. फुगडी संपल्यानंतर एकमेकांच्या पाया पडणे म्हणजे व्यक्तीला नव्हे, तर त्याच्यातील विठ्ठलाला वंदन करणे होय. ही कृती समर्पण, भक्ती आणि परस्पर आदराचे प्रतीक मानली जाते.

**अहंकारावर विजय मिळविण्याचा संस्कार**

फुगडी खेळताना उत्साह, आनंद आणि ऊर्जा यांचा अनुभव येतो. अशा आनंदाच्या क्षणीही मनात अहंकार निर्माण होऊ नये, यासाठी वारकरी नम्रतेने एकमेकांच्या चरणी मस्तक ठेवतात. वारीमध्ये श्रीमंत-गरीब, जात-पात, स्त्री-पुरुष, लहान-मोठा असा कोणताही भेद मानला जात नाही. प्रत्येक वारकरी समान आहे आणि सर्वजण विठ्ठलाची लेकरे आहेत, ही भावना या परंपरेतून अधोरेखित होते.

**क्षमायाचनेची सुंदर परंपरा**

फुगडी खेळताना कधी धक्का लागणे, हाताची पकड सुटणे किंवा पायावर पाय पडणे स्वाभाविक असते. अशा छोट्या प्रसंगांमुळे कोणाच्याही मनात राग किंवा कटुता राहू नये म्हणून खेळ संपल्यानंतर वारकरी एकमेकांच्या पाया पडून क्षमा मागतात. त्यामुळे मनातील गैरसमज दूर होतात आणि प्रेम, जिव्हाळा व बंधुभाव अधिक दृढ होतो.

**थकवा घालवणारा सामूहिक आनंद**

वारीचा प्रवास अनेक दिवसांचा आणि शेकडो किलोमीटरचा असतो. सतत चालल्यामुळे शरीर थकते. अशा वेळी फुगडी हा केवळ खेळ नसून थकवा घालवणारा आनंदोत्सव ठरतो. टाळ-मृदंगाच्या तालावर गोल फिरताना शरीरातील ऊर्जा पुन्हा जागृत होते. सामूहिक सहभागामुळे मानसिक ताणही कमी होतो आणि पुढील प्रवासासाठी नवी उभारी मिळते.

**आरोग्यासाठीही उपयुक्त**

फुगडी हा पारंपरिक व्यायामाचाही एक प्रकार मानला जातो. गोलाकार फिरल्याने शरीरातील विविध स्नायूंना चालना मिळते, संतुलन सुधारते आणि रक्ताभिसरण वेगाने होते. हात, पाय, कंबर आणि खांद्यांचा व्यायाम होत असल्याने शरीरातील ताठरपणा कमी होतो. त्यामुळे वारीसारख्या दीर्घ पायी प्रवासात फुगडी शरीराला हलके आणि ताजेतवाने ठेवण्यास मदत करते.

**समतेचा जिवंत संदेश**

वारीत राजा-रंक, शेतकरी, कामगार, अधिकारी, व्यापारी, महिला, तरुण आणि वृद्ध—सर्वजण एकाच रांगेत चालतात. फुगडीतही कोणाचाही मोठेपणा नसतो. दोन व्यक्ती समान पातळीवर उभ्या राहून आनंद व्यक्त करतात आणि शेवटी एकमेकांच्या पाया पडून नम्रतेचा संदेश देतात. ही परंपरा समाजाला समतेचा आणि परस्पर सन्मानाचा धडा शिकवते.

**वारकरी परंपरेचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान**

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांसारख्या संतांनी भक्तीचा मार्ग हा अहंकाराचा त्याग, प्रेम आणि सेवाभावाचा मार्ग असल्याचे सांगितले आहे. फुगडीनंतर पाया पडण्याची परंपरा याच संतविचारांची प्रत्यक्ष कृती आहे. भक्ती म्हणजे केवळ देवासमोर नतमस्तक होणे नव्हे, तर प्रत्येक जीवामध्ये देव पाहून त्याला नम्रतेने वंदन करणे, हा वारकरी संप्रदायाचा संदेश आहे.

**परंपरेतून मिळणारा जीवनधडा**

आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात वारीतील ही परंपरा अत्यंत प्रेरणादायी ठरते. आनंद साजरा करतानाही नम्र राहणे, चुकल्यास क्षमा मागणे, प्रत्येकामध्ये देवत्व पाहणे आणि समतेने वागणे—हेच या कृतीतून शिकायला मिळते. त्यामुळे फुगडीनंतर वारकरी एकमेकांच्या पाया पडतात, ही केवळ धार्मिक प्रथा नसून विनय, बंधुभाव, क्षमा आणि मानवतेची शिकवण देणारा संस्कार आहे. विठ्ठलभक्तांच्या या अनोख्या परंपरेतून समाजाला आजही प्रेम, समता आणि सहअस्तित्वाचा अमूल्य संदेश मिळत आहे.


## सार्वजनिक बांधकाम विभाग

**निविदा सूचनाक्र. ३५ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामासाठी **अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार** यांचेकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून **दि. २२/०७/२०२६ ते दि. २९/०७/२०२६ दु.१५.०० पर्यंत देण्यात येईल.** भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा **दि. ३१/०७/२०२६ त्या दिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यता त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत(रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Renovation of passage near lift no. 7 lobby at third floor flooring & dado at J. J. Group of Hospital; Mumbai. | ८३६४४४/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Upgradation of Passage near ward no. SICU 3rd floor flooring and dado at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८१४२३३/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Renovation of flooring and dado passage near north side passage incharge room at 3rd floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८२८७३२/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Renovation of passage near ward no. 19 flooring and dado at 3rd floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८१५२१६/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Renovation of flooring and dado passage near lift no 3 & 4 at 3rd for at J.J. Group of Hospital, Mumbai | ८४२३८४/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Renovation of flooring and dado passage near 9,10,11 lobby dado at 3rd floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४२३८०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Renovation of flooring to passage lobby near lift number 11 at 3rd floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४१९५३/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Renovation of flooring to passage lobby near lift number 10 at 3rd floor at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४३६६३/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Upgradation of passage near at first floor south side at J. J. Group of Hospital, Mumbai. | ८४१८८०/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Providing and Fixing Water meter and Sanitary line to Main Building, PGL Building, Library Building at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८१७८९७/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ११ | Providing and Fixing Water meter and Sanitary line to Resident Qrts., Admin Bldg. and OBH Building at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८१५७५३/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १२ | Providing and Fixing Water meter and Sanitary line to Dhobhi ghat at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८०१०९२/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १३ | Providing and fixing metal false ceiling to front of Anesthesia HOD office varanda area 6th floor at Sir J. J. Group of Hospital, Mumbai. | ७३८७०३/- | ८०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १४ | Providing and fixing metal false ceiling to Minor surgery O.T. varanda on sixth floor at Sir J. J Group of Hospital, Mumbai. | ७३७६१८/- | ८०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १५ | Repairs and Renovation to Flat No.16 on Third floor in Doctor Quarters Trimurti Building at Sir J.J. Group of Hospital's, Mumbai. | ८१०११६/- | ९०००/- | वर्ग-७ ववरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृतघटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचेकार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तरनिविदा सूचना पहावयास मिळेल एककिंवा सर्व निविदा कोणतेही कारणनदेता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/** ४७०८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
**दिनांक :** २६/७/२०२६.

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

**आरओसी - 2026-27/क्र- 5/C१८४०**

# १६० कोटींच्या शालार्थ घोटाळ्यात तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यास धुळ्यात अटक



**धुळे (विशेष प्रतिनिधी) :** बनावट शालार्थ आदेशाच्या आधारे शासनाची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्याला धुळ्यातून अटक करण्यात आली. या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शशिकांत भाऊराव हिंगोणीकर (वय ६६, सेवानिवृत्त शिक्षण अधिकारी, रा. निर्मला रेसिडेन्सी, फ्लॅट क्र. ९, भिकनचंद जैन नगर, पिंपराळा रोड, जळगाव) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक उपसंचालक कार्यालय, नाशिक विभागाच्या कार्यक्षेत्रातील नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये हा प्रकार उघडकीस आला आहे. नाशिक विभागातील चारही जिल्ह्यांतील ८४१ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कोणतेही वैयक्तिक मान्यता प्रस्ताव किंवा शालार्थ प्रस्ताव नसताना मागील तारखेच्या नियुक्त्या दाखविण्यात आल्या. बनावट शालार्थ आदेशांच्या आधारे शालार्थ प्रणालीत नोंदी करून संबंधितांना वेतन व थकबाकीची रक्कम मिळवून देण्यात आली. या धक्कादायक प्रकारातून शासनाची सुमारे १६० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मुख्याध्यापक, संस्थाचालक, तत्कालीन शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक व अन्य संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत सुमारे १,२०० संशयित निष्पन्न झाल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, शुक्रवारी (दि. २४) शशिकांत हिंगोणीकर याला अटक करण्यात आली. तो सन २०११ ते २०१५ या कालावधीत जळगाव जिल्हा परिषदेत माध्यमिक शिक्षण अधिकारी म्हणून कार्यरत असताना जळगाव जिल्ह्यातील एकूण २५९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेचे कोणतेही प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयात प्राप्त नसतानाही त्याने बनावट वैयक्तिक मान्यता दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी शशिकांत हिंगोणीकर याचा शोध घेतला. तो धुळे येथे असल्याची माहिती तपास अधिकारी तथा गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांना मिळाली. त्यानंतर गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ चे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोहर शिंदे, उपनिरीक्षक नंदकुमार नांदुळीकर, चंद्रकांत गवळी, तेजस मते आणि सुनील खैरनार यांनी धुळे येथे शोधमोहीम राबवून हिंगोणीकर याला ताब्यात घेतले. आरोपी शशिकांत भाऊराव हिंगोणीकर याला पुढील कारवाईसाठी नाशिकरोड पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके, रामदास शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश बोरसे, किरण शेवाळे, राजेंद्र गिते, शिवाजी कुलकर्णी आणि संदीप बागल हे करीत आहेत.

# अर्जुन काळपांडे हत्याकांड; घटनास्थळी आरोपींकडून 'क्राइम सीन'ची पुनर्रचना



**डोंबिवली (विशेष प्रतिनिधी) :** कल्याण पूर्वेकडे मलंगगड रोडवर असलेल्या ढाब्याजवळील अंजनाबाई भाने उद्यानाबाहेर २८ वर्षीय अर्जुन गजानन काळपांडे याची पूर्ववैमनस्यातून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणाचा तपास वेगात सुरू आहे. प्रकरणातील अटक केलेल्या सहा आरोपींना शुक्रवारी दुपारी मानपाडा पोलिसांनी घटनास्थळी आणून त्यांच्याकडून संपूर्ण घटनाक्रम समजून घेतला. या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी १६ जुलैच्या रात्री कल्याण-मलंगगड रोडवरील 'काकाचा ढाबा'जवळील अंजनाबाई भाने उद्यानाबाहेर पूर्ववैमनस्यातून सशस्त्र टोळक्याने अर्जुन उर्फ पेंद्या गजानन काळपांडे (२८) याच्यावर चाकूने तब्बल १६ वार करून त्याला जागीच ठार केले होते. कल्याण पूर्वेकडील चक्की नाक्यावर असलेल्या गोसावी पुऱ्यातील गजानन काळपांडे चाळीत अर्जुन राहत होता. हा हल्ला रोखायला गेलेली त्याची मैत्रीण स्नेहा पाणीग्रही हिच्यावरही हल्लेखोरांनी चाकूने वार केले. या गुन्ह्यातील अविनाश लल्लन झा, कल्पेश ज्ञानेश्वर मडवी, करण भरत गायकवाड, लकी सुनील माळी, गौरव राजू बोंबे आणि रवी सूर्यकांत लगाडे या सहा मारेकऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. शुक्रवारी मानपाडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक किरण वाघ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सर्व आरोपींना घटनास्थळी नेले. तेथे पोलिसांनी आरोपींकडून हल्ला नेमका कसा झाला? कोणी कोणावर वार केले? शस्त्रे कुठे फेकली? पळून जाताना कोणत्या रस्त्याने गेले? याची सविस्तर माहिती घेतली. आरोपींच्या जबाबाची घटनास्थळावरील पुराव्यांशी जुळवाजुळव करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. घटनास्थळी आरोपींना घेऊन केलेल्या या तपासामुळे प्रकरणातील अनेक महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट झाले असून पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलिसांना मदत होणार आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास मानपाडा पोलीस करत आहेत. जुन्या वादातून झालेल्या या हत्येने परिसरात खळबळ उडाली होती; मात्र पोलिसांनी झटपट कारवाई करून सर्व आरोपींना गजाआड केल्याने परिसरातील रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# "एफडीए"ची धडक कारवाई मालेगाव, आडगावातून लाखोंचा अन्नसाठा जप्त!



**नाशिक (विशेष प्रतिनिधी) :** अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यात विविध ठिकाणी धडक तपासणी मोहीम राबवत, लाखो रुपयांचा संशयित अन्नसाठा जप्त केला आहे. काही आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या असून, एका दुकानावर गुन्हा दाखल करून ते सील करण्यात आले आहे. मालेगाव तालुक्यातील चंदनपुरी शिवार येथील श्रीराम एंटरप्रायझेस येथे अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांनी छापा टाकून सुमारे १७ लाख २७ हजार रुपयांचे सुट्या स्वरूपातील रिफाईंड सोयाबीन तेल जप्त केले. रिपॅकर अथवा उत्पादन परवाना नसणे, विक्रीची बिले उपलब्ध नसणे तसेच भेसळीचा संशय या कारणांमुळे ही कारवाई करण्यात आली. अन्नसुरक्षा अधिकारी प्रतीक भड आणि चेतन परदेशी यांनी ही कारवाई केली. मालेगावतील कल्ली कुट्टी परिसरातील मेसर्स ए-वन ताज बेकरी येथे तपासणीदरम्यान सुमारे ४०० किलो टोस्ट (किंमत १ लाख ६० हजार रुपये) जप्त करण्यात आला. बेकरी परवान्याविना सुरू असल्याचे, उत्पादनाचा दर्जा संशयास्पद असल्याचे तसेच अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत उत्पादन सुरू असल्याचे आढळून आल्याने आस्थापनाला 'स्टॉप बिझनेस नोटीस' बजावण्यात आली. ही कारवाई प्रतीक भड आणि चेतन परदेशी यांनी केली. दरम्यान, विभागाचे सहआयुक्त (अन्न) मंगेश माने यांच्या नेतृत्वाखाली तसेच सहायक आयुक्त (अन्न) एस. एस. देवरे, डी. एस. महाले आणि व्ही. पी. धवड यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. आडगाव येथील जत्रा हॉटेल परिसरातील मेसर्स स्वागतम स्वीट्स येथे तपासणी करून नऊ किलो गाईचे तूप (किंमत ५,७६० रुपये) जप्त करण्यात आले. संबंधित तुपाचा दर्जा निकृष्ट व भेसळयुक्त असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अन्नसुरक्षा अधिकारी संकेत येलमामे आणि वैभव गर्दे यांनी ही कारवाई केली. जुने नाशिक येथील चौकमंडई परिसरातील भारत जनरल स्टोअर येथे छापा टाकून १ लाख १ हजार ७२६ रुपयांचे प्रतिबंधित अन्नपदार्थ जप्त करण्यात आले. याप्रकरणी भद्रकाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित दुकान सील करण्यात आले आहे.

# अमली पदार्थांच्या तस्करांना ठाणे वाहतूक पोलिसांनी पाठलाग करुन घेतले ताब्यात




**डोंबिवली (विशेष प्रतिनिधी) :** घोडबंदर येथील गोल्डन डायज भागात अमली पदार्थांच्या तस्करांना ठाणे वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी पाठलाग करून पकडले. या प्रकरणात पोलिसांनी त्यांच्याकडून तब्बल ३५ लाक ७० हजार ७२० रुपयांचा अमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक केले जात आहे. घोडबंदर येथील गोल्डन डायज येथे २२ जुलैला सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास वाहतूक पोलीस हवालदार सचिन खराडे आणि महिला पोलीस कर्मचारी मयुरी पवार हे वाहतूक नियमन करत होते. त्यावेळी नाशिक-मुंबई मार्गावरून जाणाऱ्या काळ्या रंगाच्या राजस्थान राज्याची वाहन नोंदीच्या कारमध्ये संशयास्पद गोण्या वाहून नेल्या जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी कार थांबविण्याचा इशारा वाहन चालकाला केला असता चालकाने वाहन न थांबवता वेगाने पळ काढला. सतर्क झालेल्या खराडे आणि पवार यांनी पाठलाग करून कार अडवली. कारमध्ये दोन जण होते. त्यापैकी चालकाच्या शेजारी बसलेला इसम संधी साधून पसार झाला, तर चालकही पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, दोन्ही वाहतूक पोलिसांनी त्याला पकडून कापूरबावडी वाहतूक उपविभाग कार्यालयात आणले. कारची तपासणी करताना कारमधील आसनावर तसेच मागील बाजूस ठेवलेल्या गोण्यांमध्ये अफूच्या सुकलेल्या बोंडांचा अमली पदार्थांचा साठा आढळून आला. याबाबत वरिष्ठांना कळवून त्यानंतर तात्काळ अंमली पदार्थविरोधी पथकाला माहिती दिली. मतदार यादी अचूकतेसाठी घरोघरी जाऊन पडताळणी करा; मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांचे आदेश त्यानुसार, अंमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कर्णवर-पाटील, पोलीस उपनिरीक्षक डुंम्मलवाड आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी पंचांसमक्ष कारची तपासणी केली. ताब्यात घेतलेल्या चालकाने त्याचे नाव सिताराम रामनिवास प्रजापती असे सांगितले. पंचनाम्यानंतर कारसह सुमारे १५० किलो वजनाचा आणि अंदाजे ३५ लाख ७० हजार ७२० रुपये किमतीचा अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी कापूरबावडी पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, ठाणे पोलीस दलाचे सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण आणि वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी पोलीस हवालदार सचिन खराडे आणि महिला पोलीस कर्मचारी मयुरी पवार यांचे कौतुक केले.

# बिहारच्या घरफोड्या टोळीचा पर्दाफाश

## कोट्यवधींचे १४ तोळे सोने जप्त




**पुणे (विशेष प्रतिनिधी) :** भाजीविक्रेत्या महिला व्यावसायिकाचे घर फोडून १४ तोळे सोन्याचे दागिने लांबवणाऱ्या आंतरराज्यीय घरफोडी टोळीचा उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने पर्दाफाश केला आहे. तब्बल चार महिने पोलिसांना चकवा देणाऱ्या आरोपींना मुंबई आणि बेंगळुरू येथून ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून १२ लाख ६० हजार रुपये किमतीचे १४ तोळे सोन्याचे दागिने बिहार येथून जप्त करण्यात आले आहेत.मौजे महाळुंगे इंगळे (ता. खेड, जि. पुणे) येथे राहणाऱ्या कविता मदन कड या भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. त्या ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुकान गाळा बंद करून यात्रेनिमित्त आपल्या मूळ गावी गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर उचकटून कपाटात ठेवलेले १४ तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिसांना सुरुवातीला कोणताही ठोस सुगावा लागला नाही. मात्र, पोलीस अंमलदार संतोष काळे आणि शुभम खंडागळे यांना गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. मुख्य आरोपी निकू सिंग हा सर्व सोने घेऊन बिहारला पळून गेला होता व पोलीस कारवाईपासून वाचण्यासाठी बिहार, मुंबई आणि कर्नाटकमध्ये लपून राहत होता. सहायक पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे आणि त्यांच्या पथकाने सलग चार महिने तांत्रिक विश्लेषण व पाठपुरावा करून रंजन सिंग याला मुंबईतून आणि मुख्य आरोपी निकू सिंग याला बेंगळुरूमधून ताब्यात घेतले. आरोपींनी दागिने मूळ गावी लपविल्याचे सांगताच, पोलीस पथकाने बिहारमधील सीतामढी येथे जाऊन सर्व मुद्देमाल हस्तगत केला. सदर गुन्ह्यात निक्कुकुमार देवकी सिंग (वय २२, रा. सीतामढी, बिहार), रंजनकुमार देवकी सिंग (वय २०, रा. सीतामढी, बिहार), राजकुमार उर्फ प्रिन्सकुमार विजय पासवान (वय १९, रा. रोहतास, बिहार), डिंपल पटेल विनोद सिंग (वय २६, रा. केमल भबुआ, बिहार) या चौघाना अटक केली आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, बसवराज तेली, पोलीस उप-आयुक्त श्वेता खेडकर, सहायक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे, पोलीस अंमलदार राजू कोणकेरी, अमोल बोराटे, विठ्ठल वडेकर, संतोष काळे, गणेश गायकवाड, संतोष वायकर, मंगेश कदम, हरी रणदिवे, मंगेश घोलप, साहिल सांडभोर, समीर महात आणि तुकाराम घुगे यांच्या पथकाने केली आहे.

# नशिराबादमध्ये देहव्यापारावर पोलिसांचा धडक छापा

## दोघे जेरबंद, दोन महिलांची सुटका




**जळगाव (विशेष प्रतिनिधी) :** नशिराबाद-सुनसगाव मार्गालगत सुरू असलेल्या कथित देहव्यापार केंद्रावर नशिराबाद पोलिसांनी धाड टाकून दोन आरोपींना अटक केली. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून सुमारे ₹९१,०६० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ जुलै रोजी नशिराबाद ते सुनसगाव मार्गावरील एका शेतात अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. माहितीची खात्री करण्यासाठी पोलिसांनी एका खाजगी पंटरला बनावट ग्राहक म्हणून संबंधित ठिकाणी पाठवले. माहितीची पुष्टी झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या नेतृत्वाखाली दुपारी सुमारे २.२० वाजता पोलिस पथकाने छापा टाकला. या कारवाईत प्रदीप जनार्दन रोटे (वय ५७, रा. नशिराबाद) आणि कैलास संजय भोई (रा. नशिराबाद) यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. घटनास्थळावरून दोन महिलांची सुटका करण्यात आली असून रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण ₹९१,०६० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी नशिराबाद पोलीस ठाण्यात संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे करीत आहेत. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि भुसावळ उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस पथकातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# बेवारस मृतदेह



वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्रमांक ५६/२०२६, कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये वय अंदाजे ४५ वर्षे, लांब चेहरा, रंग-सावळा, बांधा- मध्यम, उंची अंदाजे ५.८ इंच, केस- काळे, उजव्या हाताच्या दंडावर SUNNY GATAK व हाताच्या बोटावर BOSS असे गोंदलेले असलेला हिंदू धर्माचा बेवारस इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये बेशुद्धावस्थेत मिळून आला असून त्यास उपचाराकामी भाभा रुग्णालयात दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क- श्री. सतीश कल्याणी, पोलीस उपनिरीक्षक, वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई, मोबाईल क्र : ८३२९५७६९५७, पोलीस ठाणे क्रमांक : ८९७६९५१९७९, ०२२-२६५१३७१६**

# भाजीपाल्याच्या गाडीतून खैर लाकडाची तस्करी

## वन विभागाकडून टेम्पोसह मुद्देमाल जप्त




**वसई (विशेष प्रतिनिधी) :** पालघर जिल्ह्यातील वसई पूर्वेच्या मेढे परिसरात भाजीपाल्याच्या टेम्पोमधून सुरू असलेली खैर लाकडाची अवैध तस्करी वन विभागाने धाडसी कारवाई करत उधळून लावली आहे. भाताणे वनक्षेत्रांतर्गत मेढे-वडघर परिसरात मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वन विभागाने विशेष नाकाबंदी केली होती. पहाटेच्या सुमारास संशयास्पद टाटा इन्ट्रा (क्रमांक MH 47 AS 2460) हा टेम्पो परिसरातून जात असताना वन कर्मचाऱ्यांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाने इशाऱ्याकडे दुर्लक्ष करत वाहन भरधाव वेगाने पळवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने सुमारे ७ ते ८ किलोमीटरपर्यंत पाठलाग करून अखेर टेम्पोला अडवले. तपासणीदरम्यान टेम्पोच्या वरच्या भागात भाजीपाला ठेवून त्याखाली बेकायदेशीररीत्या खैर जातीचे लाकूड लपवून वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले. चित्रपटातील 'पुष्पा' शैलीची आठवण करून देणाऱ्या या तस्करीच्या पद्धतीमुळे वन अधिकाऱ्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. टेम्पोची झडती घेतल्यानंतर त्यामध्ये १.२८४ घनमीटर क्षमतेचे एकूण ७७ खैर लाकडाचे ओंडके आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या या लाकडाची अंदाजे किंमत ₹१४,८९२ इतकी असून, लाकडासह गुन्ह्यात वापरण्यात आलेला टाटा इन्ट्रा टेम्पोही वन विभागाने जप्त केला आहे. वन विभागाच्या पथकाने वाहन अडवल्यानंतर चालकाने अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला असून, त्याचा शोध घेण्यासाठी वन विभागाकडून कसून तपास सुरू आहे. या प्रकरणी संबंधितांवर वन कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही कारवाई डहाणूचे उपवनसंरक्षक निरंजन दिवाकर आणि मांडवीचे उपविभागीय वनाधिकारी अमित भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत भाताणेचे वनपरिक्षेत्र अधिकारी मनीष महाले, वनपाल तसेच वनरक्षकांच्या पथकाने सक्रिय सहभाग घेतला. वन विभागाने स्पष्ट केले आहे की, वनसंपत्तीची अवैध तस्करी रोखण्यासाठी अशा प्रकारच्या गुप्त माहितीच्या आधारे धडक मोहिमा पुढेही सुरू राहणार आहेत. नागरिकांनी जंगलातील किंवा वनसंपत्तीशी संबंधित कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने वन विभागाला माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. या कारवाईमुळे वसई परिसरात सुरू असलेल्या अवैध लाकूड तस्करीविरोधात वन विभागाने कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# CJP नंतर आता 'E20 जनता पार्टी' मैदानात!

## शुद्ध पेट्रोलच्या मागणीसाठी सोशल मीडियावर डिजिटल आंदोलन

**मुंबई (विशाल कारंडे) :** नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणानंतर सोशल मीडियावर चर्चेत आलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या धर्तीवर आता 'E20 जनता पार्टी' नावाचे एक नवीन डिजिटल नागरिक अभियान (Citizen Campaign) वेगाने लोकप्रिय होत आहे. ही कोणतीही नोंदणीकृत राजकीय संघटना किंवा अधिकृत राजकीय पक्ष नसून, वाहनचालक आणि ग्राहकांच्या हक्कांसाठी सुरू करण्यात आलेली स्वतंत्र सोशल मीडिया मोहीम असल्याचे अभियानाच्या आयोजकांनी स्पष्ट केले आहे. 'एक्स' (X) आणि इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत असून, अल्पावधीतच लाखो नागरिकांनी या अभियानाशी जोडले गेल्याचा दावा करण्यात येत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश केंद्र सरकारच्या इथेनॉल मिश्रित इंधन (E20) धोरणाला पूर्णपणे विरोध करणे नसून, ग्राहकांना इंधन निवडीचा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करणे हा आहे. देशातील प्रत्येक पेट्रोल पंपावर E20 इंधनासोबतच १०० टक्के शुद्ध (इथेनॉल-मुक्त) पेट्रोल उपलब्ध असावे, अशी या अभियानाची प्रमुख मागणी आहे. वाहनासाठी कोणते इंधन योग्य आहे, याचा अंतिम निर्णय वाहनचालकाने आणि वाहन उत्पादकांच्या शिफारशीनुसार घ्यावा, असा या मोहिमेचा आग्रह आहे. तसेच वाहन उत्पादक कंपन्यांनी ज्या प्रकारच्या इंधनाची शिफारस केली आहे, तेच इंधन ग्राहकांना सहज उपलब्ध व्हावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.




सर्वसामान्य नागरिकांवर कोणत्याही प्रकारचे इंधनविषयक प्रयोग सक्तीने लादू नयेत, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि इंधन धोरणांबाबत पारदर्शक व निष्पक्ष सार्वजनिक चर्चा व्हावी, असे या अभियानाचे म्हणणे आहे. सोशल मीडियावर या मोहिमेअंतर्गत विविध मीम्स, व्यंगचित्रे आणि पोस्ट्सद्वारे नागरिक आपली भूमिका मांडत आहेत. "आमची वाहने प्रयोगशाळा नाहीत" हा संदेश या मोहिमेचा प्रमुख घोषवाक्य ठरला आहे. नागरिकांच्या मते, स्वतःच्या कष्टाच्या पैशातून आणि कर भरून खरेदी केलेली वाहने ही केवळ प्रवासाचे साधन नसून अनेक कुटुंबांच्या रोजगाराचे आणि दैनंदिन उपजीविकेचे प्रमुख माध्यम आहेत. त्यामुळे इंधनाच्या गुणवत्तेचा, इंजिनच्या कार्यक्षमतेचा आणि वाहनाच्या आयुष्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आर्थिक स्थितीवर होत असल्याचा युक्तिवाद या मोहिमेतून केला जात आहे. विशेषतः जुन्या किंवा विशिष्ट प्रकारच्या वाहनांवर नवीन इंधन सक्तीने वापरण्याऐवजी ग्राहकांना योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली जात आहे. दरम्यान, या अभियानाच्या संस्थापकांनी सोशल मीडियावरून स्पष्ट केले आहे की, या मोहिमेचा कोणत्याही राजकीय पक्षाशी, विचारसरणीशी किंवा राजकीय अजेंड्याशी संबंध नाही. हे पूर्णपणे स्वतंत्र आणि निष्पक्ष नागरिक अभियान असून, इंधनाच्या गुणवत्तेबाबत पारदर्शकता आणि ग्राहकांच्या अधिकारांवर चर्चा घडवून आणणे हाच त्याचा उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी चर्चेत आलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' या व्यंगात्मक डिजिटल अभियानाशी तुलना होत असली, तरी 'E20 जनता पार्टी'चे लक्ष केवळ इंधन धोरण, ग्राहकांचे पर्याय आणि वाहनधारकांच्या हिताच्या मुद्द्यांवर केंद्रित असल्याचा दावा आयोजकांकडून करण्यात येत आहे.

### E20 जनता पार्टीचे मुख्य मागण्या काय?

- देशातील प्रत्येक पेट्रोल पंपावर E20 सह १०० टक्के शुद्ध पेट्रोल उपलब्ध करावं
- वाहन ग्राहकांनी ज्या इंधनाची मागणी केली आहे, तेच इंधन ग्राहकांना उपलब्ध करून द्यावं
- सामान्य नागरिकांच्या वाहनांवर इंधनविषयक प्रयोग सक्तीने लादू नयेत
- शुद्ध आणि चांगल्या इंधनाचा अधिकार
- वाहन आणि वाहन ग्राहकांची सुरक्षा

# सोशल मीडियात पुन्हा आरक्षणाचा मुद्दा; 'रिझर्व्हेशन हटाओ' मोहीम व्हायरल

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** इन्स्टाग्रामवर 'रिझर्व्हेशन हटाओ आंदोलन' (Reservation Hatao Andolan–RHA) या नावाने सुरू झालेली डिजिटल मोहीम अल्पावधीतच चर्चेचा विषय ठरली आहे. विविध सोशल मीडिया पोस्टनुसार, या मोहिमेच्या इन्स्टाग्राम पेजला अवघ्या २४ ते ४८ तासांत ३९ लाखांहून अधिक फॉलोअर्स मिळाल्याचा दावा केला जात आहे. यापूर्वी चर्चेत आलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी' या डिजिटल मोहिमेनंतर आता आरक्षणाच्या मुद्द्यावर ही नवी ऑनलाइन मोहीम चर्चेत आली आहे. @reservation-hataomovement या नावाने चालणाऱ्या इन्स्टाग्राम पेजवर शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणासंदर्भात विविध भूमिका मांडण्यात येत आहेत. या मोहिमेनुसार, शिक्षण आणि नोकरीतील निवड गुणवत्ता (मेरिट) व कौशल्याच्या आधारे व्हावी, सर्व नागरिकांना जात न पाहता समान संधी मिळावी, आरक्षणाचा लाभ केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाच मिळावा तसेच सरकारी कागदपत्रे आणि सार्वजनिक व्यवहारांमधून जातीचा उल्लेख टप्प्याटप्प्याने बंद करण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. "एक देश, एक ओळख – भारतीय" ही या मोहिमेची मुख्य संकल्पना असल्याचेही पेजवर नमूद करण्यात आले आहे. या मोहिमेचे कोणतेही अधिकृत संस्थापक किंवा नेतृत्व




अद्याप समोर आलेले नसून, ही राजकीय पक्षांपासून स्वतंत्र आणि तरुणांनी चालवलेली नागरिकांची सोशल मीडिया मोहीम असल्याचा दावा संबंधित पेजवर करण्यात आला आहे. "सारी जाति एकसमान, मेरा बस ये देश महान", "मेरिट हमारा हक है, कोटा नहीं" अशा घोषणांसह "शिका, आंदोलन करा आणि संघटित व्हा" असा संदेशही या मोहिमेत दिला जात आहे. दरम्यान, सोशल मीडियावर या मोहिमेबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सामान्य प्रवर्गातील काही तरुणांनी गुणवत्ता-आधारित निवड प्रक्रियेच्या मागणीसह मोहिमेला पाठिंबा दर्शविला आहे. तर अनेक बहुजन, अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्गीय (OBC) संघटनांशी संबंधित व्यक्तींनी या मोहिमेला विरोध दर्शवित आरक्षण ही भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्यायाची तरतूद असल्याची भूमिका मांडली आहे.

# 'CKYC 2.0' प्रणालीमुळे कागदपत्रांविना बँक खाते उघडणे सोपे

**वृत्तसंस्था :** केवायसी (KYC) प्रक्रियेत मोठा बदल घडवून आणणारी 'सेंट्रल नो-युअर-कस्टमर (CKYC) 2.0' प्रणाली ऑगस्ट महिन्यापासून टप्प्याटप्प्याने सुरू होणार आहे. या नव्या प्रणालीमुळे ग्राहकांना बँक, विमा कंपनी किंवा भविष्यात म्युच्युअल फंड आणि इतर वित्तीय संस्थांकडे वारंवार केवायसी कागदपत्रे सादर करण्याची गरज कमी होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला भारतीय बँका आणि विमा कंपन्या या प्रणालीचा वापर करतील, त्यानंतर मालमत्ता व्यवस्थापन कंपन्या (Asset Management Companies), म्युच्युअल फंड आणि इतर भांडवली बाजारातील संस्थांचाही त्यामध्ये समावेश केला जाणार आहे. या प्रणालीअंतर्गत ग्राहकाने एकदाच केवायसी पूर्ण केल्यानंतर त्याची माहिती केंद्रीय नोंदणीत सुरक्षित ठेवली जाईल. त्यानंतर नवीन खाते उघडताना किंवा केवायसी अद्ययावत करताना संबंधित संस्थांना ग्राहकाच्या संमतीनंतर ही माहिती थेट केंद्रीय डेटाबेसमधून मिळू शकेल. त्यामुळे प्रत्येक वेळी आधार, पॅन, पत्त्याचा पुरावा किंवा इतर कागदपत्रे पुन्हा सादर करण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. भारत गेल्या काही वर्षांपासून सिंगापूर आणि काही युरोपीय देशांप्रमाणे एकसमान डिजिटल ओळख प्रणाली विकसित करण्याच्या प्रयत्नात असून, CKYC 2.0 हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या प्रणालीमुळे बँकिंग, विमा, गुंतवणूक आणि इतर वित्तीय सेवांचा लाभ अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळण्याची अपेक्षा आहे. नियामक सूत्रांच्या माहितीनुसार,




नव्या CKYC 2.0 प्रणालीमुळे ग्राहकांची माहिती अधिक अचूक आणि विश्वासार्ह होणार असून, आर्थिक फसवणूक रोखण्यासही मोठी मदत मिळेल. भारतात यापूर्वीही केंद्रीय केवायसी नोंदणी व्यवस्था अस्तित्वात असली तरी त्यामधील डुप्लिकेट नोंदी, अपूर्ण माहिती आणि माहितीच्या अचूकतेबाबतच्या शंका यामुळे तिचा व्यापक वापर झाला नव्हता. तसेच काही वित्तीय संस्थांकडून या नोंदी पूर्णपणे स्वीकारल्या जात नसल्याने ग्राहकांना प्रत्येक नवीन वित्तीय उत्पादनासाठी पुन्हा केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागत होती. नव्या प्रणालीमध्ये प्रत्येक नोंदीसोबत 'कॉन्फिडन्स स्कोअर' दिला जाणार असून, संबंधित माहिती कोणत्या संस्थेने आणि कोणत्या पद्धतीने पडताळून सत्यापित केली आहे, याचीही स्पष्ट माहिती उपलब्ध असेल. यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढण्याबरोबरच संस्थांनाही अधिक विश्वसनीय माहितीचा आधार मिळणार आहे. नियामक संस्थांकडून आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वर्षअखेरीपर्यंत म्युच्युअल फंड, ब्रोकरेज आणि इतर भांडवली बाजारातील संस्थाही या प्रणालीशी जोडल्या जाण्याची अपेक्षा आहे. एसबीआय फंड्स मॅनेजमेंटचे संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डी. पी. सिंग यांनी सांगितले की, युनिव्हर्सल कस्टमर आयडेंटिफिकेशन प्रणालीमुळे वित्तीय क्षेत्रात नव्या गुंतवणूकदारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढू शकते. पात्र ग्राहकांपैकी अल्प प्रमाणात जरी अधिक लोकांनी म्युच्युअल फंड किंवा इतर वित्तीय उत्पादनांमध्ये गुंतवणूक सुरू केली, तरी त्याचा संपूर्ण उद्योगाला मोठा फायदा होईल. त्यामुळे CKYC 2.0 ही प्रणाली भारतातील डिजिटल वित्तीय सेवांच्या विस्तारासाठी आणि आर्थिक समावेशनाला गती देण्यासाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे मानले जात आहे.

# IIM शिलाँगमध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कांस्य पुतळ्याचे अनावरण

**वृत्तसंस्था :** माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ११व्या पुण्यतिथीनिमित्त आयआयएम शिलाँग येथे त्यांच्या ८ फूट उंच कांस्य पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. आयआयएम शिलाँगच्या 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स'चे अध्यक्ष शिशिर कुमार बाजोरिया यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. यावेळी बोर्डाचे सदस्य, संचालक प्रा. (डॉ.) अरुण मोहन शेरी, मुख्य प्रशासकीय अधिकारी कर्नल दिनेश अधिकारी (निवृत्त), प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. कलाम यांनी याच संस्थेत "आपला ग्रह अधिक राहण्यायोग्य कसा बनवावा" या विषयावर आपले अखेरचे प्रेरणादायी व्याख्यान दिले होते. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी उपस्थितांनी पुतळ्याला पुष्पार्पण केले. ८ फूट उंच, ३.२५ फूट रुंद आणि ३.५ फूट खोली असलेला हा कांस्य पुतळा शिक्षण, नाविन्य, वैज्ञानिक प्रगती आणि राष्ट्रसेवेसाठी डॉ. कलाम यांनी दिलेल्या योगदानाचे प्रतीक आहे. आपल्या



अंतिम व्याख्यानात त्यांनी पर्यावरण संवर्धन, नैतिक नेतृत्व, नाविन्यपूर्ण विचार आणि शाश्वत भविष्य घडविण्यासाठी सरकार, उद्योग, वैज्ञानिक, संस्था आणि युवकांची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली होती. विद्यार्थ्यांमध्ये 'कलाम सर' म्हणून लोकप्रिय असलेले डॉ. कलाम यांची नम्रता, प्रज्ञा आणि शिक्षणाप्रती असलेली निष्ठा आजही तरुणांना प्रेरणा देत आहे. त्यांच्या विचारांना अभिवादन करत आयआयएम शिलाँगने शिक्षण, संशोधन, नाविन्यपूर्णता, शाश्वतता आणि नैतिक नेतृत्वासाठी आपली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित केली.

# अतिधोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या करा; आयुक्तांचा इशारा

**विरार (रघुनाथ कदम) :** मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहर महापालिका क्षेत्रातील जीर्ण व संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत इमारतींचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या करून सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याचे निर्देश महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत. महापालिकेने शहरातील जुन्या व जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण करून धोकादायक व अतिधोकादायक इमारती घोषित केल्या असून संबंधितांना नोटिसा बजावल्या आहेत. या नोटिसांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अलीकडे काही इमारतींमध्ये अचानक छत किंवा स्लॅब कोसळण्याच्या घटनांमुळे खबरदारीचे उपाय अधिक कडक करण्यात आले आहेत. इमारतीचे



वय कितीही असले तरी सर्व गृहनिर्माण संस्था, इमारत मालक आणि व्यवस्थापनांनी दरवर्षी पात्र संरचनात्मक अभियंत्याकडून 'स्ट्रक्चरल ऑडिट' करून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. ऑडिट अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती व मजबुतीकरणाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. बीम, स्लॅब, पिलर किंवा भिंतींना तडे जाणे, काँक्रीट निखळून लोखंडी सळया दिसणे, इमारत झुकणे, मोठ्या प्रमाणावर प्लास्टर गळणे, विचित्र आवाज येणे किंवा पावसामुळे गंभीर गळती होणे ही धोकादायक इमारतीची प्रमुख लक्षणे असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. अशी चिन्हे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ इमारत रिकामी करून महापालिकेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्ट्रक्चरल ऑडिट न करणे किंवा महापालिकेच्या आदेशांचे उल्लंघन केल्यामुळे दुर्घटना घडल्यास त्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी संबंधित इमारत मालक, विकासक आणि गृहनिर्माण संस्थेवर राहील. अशा घटनांसाठी महापालिका जबाबदार राहणार नसल्याचा स्पष्ट इशारा आयुक्तांनी दिला आहे.

# कारगिल विजय दिनानिमित्त सैनिक रत्न पुरस्काराने सुभेदार सुभाष दरेकर यांचा गौरव

**मुंबई (राकेश गायकवाड) :** कारगिल विजय दिनानिमित्त सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्यच्या वतीने फोर्ट येथील शहीद स्मारक परिसरात उत्साहात कार्यक्रम पार पडला. शेकडो माजी सैनिक, सैनिक कुटुंबीय आणि देशभक्त नागरिकांच्या उपस्थितीत कारगिल युद्धातील शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली. यावेळी सैनिकी सेवेसह सामाजिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल सुभेदार सुभाष दरेकर (निवृत्त) यांना 'सैनिक रत्न' आणि 'सर्टिफिकेट ऑफ एक्सलेन्सी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २६ जुलै १९९९ रोजी झालेल्या कारगिल युद्धातील भारतीय जवानांच्या शौर्याचे स्मरण करत ५२७ शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थितांनी भारत माता की जय आणि जय जवानच्या घोषणांनी शहीदांना अभिवादन केले. याच दिवशी सैनिक फेडरेशनच्या स्थापनेलाही वर्षपूर्ती झाल्याने . सैनिक फेडरेशनचा वर्धापन दिनही साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत होते. प्रमुख पाहुणे म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपमहानगर आयुक्त विश्वास पांडुरंग मोटे, बेस्ट समितीच्या अध्यक्षा तृष्णा विश्वासराव, ब्रह्मकुमारी गायत्री दीदी, मुंबई विद्यापीठाचे माजी प्राचार्य दिलीप पाटील, कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सकाळी शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विविध




मान्यवरांनी कारगिल युद्धातील शौर्य, सैनिकांचे योगदान आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. महाराष्ट्रभरातून आलेल्या माजी सैनिकांसाठी बेस्ट प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते शिवाजी मंदिर, दादर या मार्गावर मोफत बससेवा उपलब्ध करून दिली. अध्यक्षीय भाषणात ब्रिगेडियर सुधीर सावंत यांनी सैनिक फेडरेशनच्या विविध उपक्रमांची माहिती देत माजी सैनिकांनी संघटित राहून सैनिकांच्या कल्याणासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना जनरल सेक्रेटरी सुभेदार निंबाळकर यांनी केली, सूत्रसंचालन डॉ. संजय रहाटे यांनी केले, तर उपाध्यक्ष सुभेदार सुभाष दरेकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला ठाणे, पालघर, रायगड, अकोला, वाशिम, अमरावती, सातारा, कोल्हापूर, नवी मुंबई आणि मुंबईसह राज्यातील विविध जिल्ह्यांतील सैनिक फेडरेशनचे पदाधिकारी, सदस्य, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि शेकडो माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे कठोर पाऊल

## धबधबे आणि चौपाट्यांवर ३ ऑगस्टपर्यंत प्रवेशबंदी बंदी

**वसई (सुचिता देशमुख) :** मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-२ अंतर्गत येणाऱ्या धबधबे, समुद्रकिनारे आणि निसर्ग पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. पोलीस उपआयुक्त अशोक विरकर यांनी जारी केलेला हा आदेश ३ ऑगस्टपर्यंत लागू राहणार असून, त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. पावसाळ्याच्या काळात पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि इतर परिसरांतून मोठ्या संख्येने पर्यटक वसई परिसरातील धबधबे, समुद्रकिनारे आणि नैसर्गिक पर्यटनस्थळांना भेट देतात. मात्र, अतिवृष्टी, वेगवान पाण्याचा प्रवाह, घसरडे खडक आणि वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या घटना लक्षात घेता नागरिकांच्या जीवित व वित्तहानीची शक्यता टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. वसई, नायगाव आणि वालीव पोलीस ठाण्यांकडून वाढती गर्दी व संभाव्य अपघातांचा धोका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर हा आदेश लागू करण्यात आला. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सार्वजनिक ठिकाणी छेडछाड, टिंगलटवाळी, अश्लील हावभाव, शेरेबाजी किंवा लज्जास्पद वर्तन करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या काळात संबंधित पर्यटनस्थळांवर पाचपेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली असून, पावसाच्या पाण्यात उतरून पोहणे, खोल पाण्यात जाणे, धबधब्याखाली बसणे, धोकादायक ठिकाणी किंवा कठड्यांवर उभे राहून सेल्फी काढणे अथवा चित्रीकरण करणे यावरही बंदी असेल. तसेच मद्यपान करून किंवा मद्य बाळगून पर्यटनस्थळी प्रवेश करणे, अनधिकृत मद्यविक्री, सार्वजनिक ठिकाणी मद्यसेवन, धोकादायक पद्धतीने वाहने उभी करणे किंवा बेदरकार वाहन चालविणे यावरही कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. या आदेशानुसार वसई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुरुची बीच,



रानगाव बीच, ब्रह्मपाडा बीच, भुईगाव बीच, बेनापट्टी बीच, वसई किल्ला जेटी आणि पाचूबंदर जेटी, नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचोटी धबधबा आणि कामण देवकुंडी, तसेच वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजीवली खदान आणि खैरपाडा-धुमाळनगर खदान परिसराच्या १०० मीटरच्या परिघात हे निर्बंध लागू राहणार आहेत. पर्यावरण संवर्धनालाही या आदेशात विशेष महत्त्व देण्यात आले असून, सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक, काचेच्या बाटल्या, थर्माकोल किंवा इतर कोणताही कचरा टाकण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच ध्वनी, वायू आणि जलप्रदूषण होईल अशा कोणत्याही कृतीवर बंदी घालण्यात आली असून, मोठ्या आवाजात डीजे, संगीत यंत्रणा किंवा वाहनांमधील स्पीकर वाजवण्यास परवानगी दिली जाणार नाही. पोलीस प्रशासनाने नागरिक आणि पर्यटकांना नियमांचे काटेकोरपणे पालन करून सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. पावसाळ्यात धोकादायक ठिकाणी पर्यटन करण्याचा मोह टाळावा, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेची जबाबदारी ओळखून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. मान्सूनच्या काळात वाढणाऱ्या अपघातांना आळा घालणे, पर्यटकांचे प्राण वाचवणे, महिलांच्या सुरक्षिततेची हमी देणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे हा या प्रतिबंधात्मक आदेशामागील प्रमुख उद्देश असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### बंदी घालण्यात आलेली प्रमुख प्रसिद्ध पर्यटनस्थळे

**१. समुद्रकिनारे**
- सुरुची समुद्रकिनारा
- रानगाव समुद्रकिनारा
- भुईगाव समुद्रकिनारा
- बेनापट्टी समुद्रकिनारा
- ब्राह्मणपाडा समुद्रकिनारा
- अर्नाळा समुद्रकिनारा
- कळंब, नवापूर आणि राजोडी समुद्रकिनारा

**२. धबधबे आणि खदाणी**
- चिंचोटी धबधबा
- तुंगारेश्वर धबधबा
- कामण येथील देवकुंडी धबधबा
- राजावळी खदाण (खाण परिसर)

**३. धरणे आणि तलाव**
- फुलपाडा धरण
- पेल्हार धरण
- तानसा नदी परिसर
- कुंभारपाडा तलाव